चैतन्य लहरी

मराठी आवृत्ती

खंड 3 अंक 2 व 3

---

---

पुजाही कोणत्याही प्रकारच्या समारंभासाठी नाही. ती फक्त आपल्या प्रेमाच्या आनंदात ओलेचिंब होण्यासाठी आहे.

श्री माताजी निर्मलादेवी

## प रि च य

सहजयोगी असल्यामुळे **श्री आदिशक्तिची** व्यक्तिरूपांत किंवा **त्यांच्या** फोटोची पुजा करण्याचा मान आपण संपादन केला आहे. हीपूजा व्यक्तिरूपाने किंवा **त्यांच्या** सर्व ब्रम्हांडव्यापी अस्तित्वाद्वारा अंगिकृत केली जाते.

सहजयोगी जेव्हां **श्री माताजींची** पुजा करतात त्यावेळी त्यांची जबाबदारी असते कारण ज्यावेळी आपण त्यांचे ध्यान करतो, त्यांची प्रार्थना करतो त्यावेळी त्या आपल्याबरोबर असतात. म्हणून चित्त पूर्णपणे **श्री माताजींच्या** चरणकमलावर स्थिर ठेवून पुजा केली पाहिजे. हेतुपुरस्सर नसले तरीही, पुजेमध्ये एकचित्त नसणे हे अनादर दर्शविण्याप्रमाणेच आहे. **आदिशक्तिचे** स्तवन करण्यासाठी मंत्रोच्चारण केले जाते आणि ते सुध्दा आपण भक्तिने अर्पण केलेल्या गोष्टींचा स्विकार करण्यासाठी केलेल्या प्रार्थनांचेच एक रूप आहे.

शुध्द एकनिष्ठता हृदयापासून येते, त्याचं प्रतिबिंब आहे आत्मा, आपल्या प.पू. आईची जेव्हां आपण मंगलदायी पुजा करतो त्यावेळी आत्मा आनंदित होतो. पुजेमध्ये हृदयाची सांगड असली पाहिजे असे **श्री माताजींनी** सांगितले आहे. त्यामुळे प्रत्येक पायरीला सुरेख व्हायब्रेशन्स जागृत होतात आणि हजर असलेल्या प्रत्येकाला दैवी आनंदाची मजा लुटायला मिळते. पुजा आपल्या आंतल्या संस्थेचा भाग झाली पाहिजे. **श्री माताजींच्या** एका पत्रामध्ये त्यांनी म्हटलं आहे की पुजा हृदयामध्ये केली पाहिजे. पुजेची दृश्ये हृदयामध्ये चित्रित झाली पाहीजेत आणि आनंदाचे सदैव स्त्रोत बनली पाहिजेत. हृदयाला **आदिशक्तिचे** सिंहासन बनूं दे. मग शुध्द झालेल्या चित्ताने गंगाजलासारख्या पवित्र आणि अमृतासारख्या शुभदायी अशा त्यांच्या चरणकमलांची पुजा करा.

अध्यात्मिक उन्नतीसाठी पुजा ही फार चांगली वाहिनी आहे आणि **आदिशक्तिचे** आशिर्वाद जागृत करते असे आदिशंकराचार्यांनी म्हटले आहे. त्यांनी यांवर भर दिला आहे की जेव्हां चित्त ब्रम्हचैतन्याशी ऐक्य साधतं त्यावेळी निर्विकल्पा मधील योगी भक्त आणि आराध्य दैवत्तामधील द्वैताच्या पलिकडे जातो. जर आपल्या प.पू. श्री माताजी सदैव उपस्थित आहेत तर त्यांनी येऊन पुजा स्विकारण्यासाठी आपण जागृत काय करणारं ? विश्वच त्यांच्या अस्तित्वांत सामावले असताना आपण त्यांना काय देऊं शकणार ?

आपल्या आईने हे साकार स्वरूप घेतलं, जे त्यांच्या निराकार स्वरूपाला जाणूं शकत नाही त्यांना त्यांची पुजा करण्याची संधी दिली, त्याबद्दल जगांतील आपण सर्व सहजयोगी यांनी किती कृतज्ञ असलं पाहिजे ।

## श्री माताजींच्या भाषणांतील पुजेसंबंधीचे कांही उतारे

### 5 मे 1980 सहस्त्रारदिन पुजा

आज मी तुम्हांला सहज योगाबाबतची आणखी कांही गुपितं सांगणार आहे. ती अशी की पुजेसांठी मध्यम प्रकारचे लोक तुम्ही आणतां नये. कारण पुजा पेलवणे फार कठीण असते. माझं अस्तित्व, माझे चरण, माझे हात यांच महत्व लोकांना अजून कळलं नाही. ते इथे असूं शकत नाहीत, नव्हे त्यांची इथे असण्याची लायकी नाही. तेंव्हां, तो तुमचा मित्र आहे, किंवा बहिण आहे, किंवा भाऊ आहे म्हणून कोणालाही इथे आणूं नका. ते चूक आहे. त्या व्यक्तिच्या संधीचे तुम्ही नुकसान करीत आहांत कारण हे सर्व त्याला फार जास्त आहे. तो ती पेलवूं शकत नाही. फार थोडया लोकांसाठी ती असते. तेव्हां लक्षात ठेवा अनेक लोकांसाठी ती नाही.

आतां, ज्याला आपण चरणामृत म्हणतो, म्हणजे माझ्या चरणांमधील अमृत हे प्रत्येकासाठी नाही. तसेच पूजेचे आशिर्वाद प्रत्येकासाठी नसतात. तेव्हां जे लोक पूर्णतः तयार झालेले नाहीत त्या लोकांना टाळा. पहिली गोष्ट त्यांना संशय वाटूं लागेल. त्याशिवाय वागणूकीच्या रितीरिवाजांविषयी प्रश्न उद्‌भवेल त्या प्रोटोकॉलासकट त्याचा स्विकार ते करूं शकणार नाहीत. इथे हजर असणं हा फार मोठा अधिकार आहे आणि हा अधिकार प्रत्येक व्यक्तिला दिला जाऊं शकत नाही.

तुम्हांला समजणार असेल, तर हे सहजयोगाचं गौप्य आहे. आणि या गुपीतामध्ये सुरुवातीलाच तुम्हांला फार थोडी लोकं सामावून घेतली पाहिजेत. सर्व कांही एक दिवशी उघडकीस येणार आहे, पण प्रत्येकासाठी नाही. तुम्ही अधिकाराला पात्र आहांत हे तुम्हांला कळलं, तर तुम्ही हे अधिकार मिळाल्याचे जाणून तसे वागाल. आज पूर्ण जगामध्ये अनेक लोक ध्यान करीत आहेत. या सर्व लोकांचा मी विचार करते आहे. तुम्हांलाही त्या सर्वांचा विचार केला पाहिजे आणि माझ्या अस्तित्वाचे तुमच्या प्रमाणेच ते देखील अंगप्रत्यंग आहेत, हे जाणले पाहिजे. आणि तुम्ही जागरूक असलेले आहांत.

तेव्हां आता यावेळी या पुजेमध्ये तुम्ही फक्त तुमच्यासाठी लंडनच्या लोकांसाठी पुजा करीत नाही, तर पूर्ण जगासांठी करीत आहात, नुसत्या जगभर असलेल्या सहजयोग्यांसाठी नाही. पण या पुजेमध्ये तुम्ही स्वतःला अशा प्रकारे व्यक्त करीत आहांत की, तुम्ही ते सहजयोगी आहांत, ज्यांनी मला जाणलं आहे, आणि अशी विनंती करीत आहात, की इतर लोकांना अशा प्रकारे आशिर्वादित करा, ज्यायोगे त्यांनी सुध्दां मला जशा प्रकारे तुम्ही ओळखले आहे, तसे ओळखावे. या पुजेमुळे ओळख जास्त स्पष्ट होईल, असं मला वाटतं. माझी ओळख पटल्यावरच, तुम्हाला तुमची ओळख होईल आणि सर्व गोष्टी फार फार सुरेखरित्या कार्यान्वित होतील.

फक्त तुम्ही प्रामाणिक असले पाहिजे. सहजयोगामध्ये खेळ खेळता नये. त्यामुळे तुम्हांला अपाय होईल आणि इतर सहजयोग्यांना सुध्दां त्रास होईल तेव्हां खेळ खेळण्याचा प्रयत्न करूं नका. त्याने तुम्हाला त्रास होईल कारण बंधविमोचनाच्या मार्गाला तुम्ही अपाय करत आहांत आणि त्यामुळे तुम्हांला

शिक्षा मिळेल. त्याचा निकाल म्हणजे तुम्हीच सर्व हरवून बसाल तेव्हां कृपा करून प्रामाणिक राहाण्याचा प्रयत्न करा. ते कांही कठीण नाही. अशा प्रकारे समजता नये., खूप लोकांना मी पाहिलं आहे. त्यांना वाटतं मी कडक शिक्षा करते, आणि हे शब्द - श्री माताजीसाठी अयोग्य आहेत. ते वापरता नये. अनेक शब्द असे आहेत,जे माझ्यासाठी वापरतां नयेत. हा फक्त तुमचा विशेष अधिकार आहे इथे असणं हा. आणि तुम्ही समजून घेतलं पाहिजे की, ज्या लोकांची योग्यता असते त्यांना विशेष अधिकार दिले जातात. मी तुम्हांला या गोष्टी सांगते आहे, कारण तुमची योग्यता आहे.

प्रामाणिकपणा ही तुमच्या यशाची गुरूकिल्ली आहे. हा विशिष्ट अधिकार आहे. मी तुम्हांला चावी देत आहे, तसं तर पाश्चात्य मनाला - लोक विचार करतात, की तुम्ही एखाद्याला कांही सांगितले तर तर ते "कडक शिक्षा" वगैरे शब्द वापरू शकतात. आणि हे शब्द वापरायचे नसतात. शब्द नियमांनुसार वापरले पाहिजेत, योग्य ते वापरले पाहीजेत.

तुमच्या वागणुकीच्या नियमांत जर तुम्ही योग्य नसाल तर तुम्हांला माहीत आहे. चुकीच्या जाळयांमध्ये चुकीची भांडी घालण्याचा प्रयत्न करून सर्व गोष्टीचा विचका होतो. तेव्हां तुम्ही ते कशाप्रकारे पेलवणार याबद्दल दक्ष रहा. विशिष्ठ अधिकार म्हणून संभाळा. ती तुम्हांला दिलेली व्ही.आय.पी. ट्रिटमेंट वागणूक आहे. तुम्ही सर्व व्ही.आय.पी. आहांत. अशा प्रकारे सर्वांशी मी बोलूं शकत नाही. पण तुमच्याशी बोलूं शकते कारण मला तुम्हाला सर्व चाव्या द्यायच्या आहेत.

तुम्ही जर स्वतःकडे या दृष्टीने पाहीलं की, तुम्हांला किती अधिकार दिला आहे, तो समजून घेतला, सहजयोग हा काय आहे हे जाणलं, तर तुम्ही ओळखूं शकाल की, इथे असण्याचा केव्हढा विशिष्ट मान तुम्हाला मिळाला आहे, किती नशीब, किती बक्षीस आहे ते. तुम्ही जे कांही केलं त्याबद्दल इथे असल्याने किती जन्म पूर्णपणे बक्षीस दिलं गेलं आहे. यामुळे जास्त प्रामाणिकपणे पुजा करायला तुम्हाला मदत होईल. ईश्वर तुम्हांला आशिर्वाद देवो.

आतां पुजेनंतरसुध्दां तुम्ही ध्यान केले पाहिजे. कारण ध्यानाशिवाय तुम्ही माझी व्हायब्रेशन्स शोषून घेऊं शकत नाही. ते नेहमीच होतं, अजूनपर्यन्त फार थोडया पुजा अशा झाल्या आहेत, ज्यांत माझी सर्व व्हायब्रेशन्स शोषून घेतली गेली. प्रश्न विचारायचे नाहीत, आणि चुकीचं वागायचं नाही, असं तुमच्या मनाला सांगा. फक्त स्पष्टपणे व्हायब्रेशन्स शोषून घ्यायची, हे तुमच्या स्वतःच्या पोषणासांठी आहे, तुमच्या स्वतःच्या वाढीसाठी तुमच्या स्वतःच्या आनंदासाठी.

देव तुम्हांला आशिर्वाद देवो.

## श्री माताजींच्या भाषणांतील कांही उतारे

पुढील भाषण "पुजेचा अर्थ"                                                        ब्राइटन 19 जुलै 1980.

आतां पुजेबाबत प्रत्येकाला कळलं पाहिजे की आत्मसाक्षात्कार मिळाल्याशिवाय पुजेला अर्थ नसतो कारण तुम्ही "अनन्य" नसता म्हणजेच तुमच्या चैतन्यरूपी पूर्ण अस्तित्वाची तुम्हाला जाणीव नसते.

भक्तिविषयी कृष्णाचं वर्णन आहे "अनन्य" ते म्हणतात,

"मी अनन्य भक्ति देईन."

त्यांना अनन्य भक्ति पाहिजे. म्हणजे तिथे दुसरे कोणी नाही— म्हणजेच, जेव्हां तुम्हाला आत्मसाक्षात्कार मिळतो. नाहीतर ते म्हणतात,

पुष्पम - फलम् - तोयम्

- फुले, फळे, पाणी - जे द्याल ते मी स्विकारेन. पण जेंव्हा देण्याची वेळ येते तेव्हां ते म्हणतात.

तुम्हाला अनन्य भक्ति घेऊन माझ्याकडे आले पाहिजे त्याचाच अर्थ -

जेंव्हा तुम्ही माझ्याबरोबर एकेकारिता प्राप्त करता तेव्हां तुम्हांला भक्ति पाहिजे त्याआधी नाही. त्याआधी तुमचा संबंध जुळला नसतो.

आतां, पुजा हे डावीकडचे क्षेपण आहे. उजवीकडची बाजू यामुळे बरीचशी तटस्थ होते मुख्यत्वे जे लोक फार उजवीकडील असतात, वातावरण, जे फार उजवीकडचं असतं. पुजा त्यांच्यासाठी आदर्श आहे. हिच्यामध्ये तुम्ही दर्शविता, प्रकट करता, भक्ति आराधना तुम्ही प्रकट करता. तुम्ही जेव्हां पूजा करता, त्यावेळी खरोखर काय होतं ? हे शोधलं गेलं आहे आणि आतां, ज्याप्रमाणे मी तुम्हाला सांगते आहे. त्याप्रमाणे. प्रथम तुम्हांला तुमच्यामध्ये असलेल्या देवता, ज्या अजून झोपलेल्या आहेत त्यांना पुजा करून जागृत केले पाहिजे. पण या देवता, आदिदेवता, माझ्यामध्ये असल्यामुळे तुम्ही माझी पूजा करता आणि माझ्यामधले प्रत्येक दैवत जागृत होते. ज्यायोगे तुमच्या देवता जागृत होतात. तर स्विकार करण्यासाठी प्रथम तुमची व्हायब्रेशन सुधारली पाहिजेत.

जर स्विकार बरोबर नसेल तर कुठल्याही पुजेचा किंवा क्षेपणाचा काय उपयोग ? म्हणून प्रथमतः आपण आपले यंत्र तयार करतो, किंवा आपले क्षेपणास्त्र तयार करतो. ही तयारी जिला आपण कुंडलिनी पुजा म्हणतो - वेगवेगळया देवतांची पुजा करून करतो. माझ्या कुंडलिनीची पुजा करून तुम्ही तुमच्यामधील प्रतिबिंब सुधारता, कारण तेव्हां माझ्यामधील व्हायब्रेशन्स तुमच्यामध्ये वाढू लागतात. आणि ती जागृत करतात. तुमच्या संबंधात हे असे क्षेपण असते. जेव्हां यंत्र बरोबर असते तेव्हां तुम्ही बाहेर क्षेपण करता. आणि कशाप्रकारे तुम्ही क्षेपण करता ? देवीची "सर्व विश्वाची रक्षणकर्ती" म्हणून पूजा

करून, तिच्या शक्तिंची पुजा करून तसे म्हणून, ते परत परत म्हटल्यामुळे, तुमच्या क्षेपणामध्ये तिच्या शक्तीचा प्रतिध्वनी उमटतो. आणि मग तुमचे क्षेपण त्याप्रकारे शक्तिमान बनते. ही फार सूक्ष्मामध्ये घडून येणारी घडामोड आहे. फार चमत्कारीक आहे ते. या गोष्टी किती साध्या दिसतात. जसे माझे चरण प्रक्षालन करणे. साधी गोष्ट आहे माझ्या चरणाचे प्रक्षालन. आतां हे चरण पहा - तुम्हांला पूर्ण विश्व दिसतं कां ? मला माहीत नाही, मला तिथे दिसतं. आणि त्यांना बघून मी खरोखर स्तंभित होते.

तुम्ही जेंव्हा माझ्या चरणांचे प्रक्षालन करता तेंव्हां काय करता ? खरं तर माझे पाय खूप काम करीत आहेत, आणि त्यानंतर त्यांना शांत करायला तुम्ही थोडे पाणी घालता, या पायांनी केलेल्या कष्टांची तुम्हांला जाणीव आहे, हे सुचविण्यासांठी आणि एक प्रकारचं अतिशय मधुर, मंजुळ असं प्रेम या चरणांतून नंतर वाहूं लागतं.

जसं, आज मी येत होते आणि अचानक मला पॉल उभा असलेला दिसला. तीच गोष्ट झाली, पहा, किती काळजी आहे, केव्हढी समज! आई येते आहे तीने कुठे वाट चुकतां नये, तेव्हढंच. आणि ही गोष्ट पाघळू लागली. कारण या प्रेमाला सारं कांही समजतं, कांहीही नको असतं पण तिथें जर कोणी ते प्रेम घेण्यासांठी असेल, तरच ते उद्दीपित होतं.

आतां, तुम्ही स्विकार करणार आहांत असं तुम्ही कसं काय म्हणणार ? या छोटया छोटया गोष्टी दर्शवून! जेंव्हा तुम्ही माझ्या पायांना शांत करता, धुऊन काढता, साफ करता, त्याचा अर्थ काय होतो माहीत आहे ? ओळख. ती जाण तुम्ही कशी प्रदर्शित करणार ? असं पहा, हे समारंभ, छोटे समारंभ फार महत्वाचे आहेत कारण ते तुमची ओळख पटली हे प्रदर्शित करतात. हे संपूर्णपणे केलं गेलं असतं, झालं, उरकलं असतं आणि तुम्ही हे कां करीत आहांत, हे कळलं असतं तर ते पूर्णपणे चैतन्यमय असतं. नंतर तुम्ही थोडं तेल लावता आणि इतर गोष्टी. परत माझ्या पायांना बरं वाटावं म्हणून नुसतं असं म्हणण्यासाठी की "आई, तूं खूप कष्ट घेतलेस, तुझ्या चरणांनी खूप काम केलं आहे."

नुसतं ते म्हणून, मी म्हणते, कांही फरक पडत नाही - तुम्ही अत्यंत व्यावहारिकरित्या म्हणाल तर - पण हया प्रेममय चरणांना त्यांचा फार मोठा फरक पडतो. जसं माधुर्य, छोटीशी गोष्ट, लहान बाळ आपल्या आईच्या गालावर नुसता हात ठेवतं. आणि कृतज्ञता दाखविण्यासाठी आईचं हृदय प्रेमाने उचंबळूं लागतं. हे फार परस्पर पूरक वागणं आहे. ते फार सूक्ष्मातलं आहे आणि त्या प्रकारचं सूक्ष्मातलं कार्य आधीच नियोजित केलेलं असतं. ते तशा प्रकारेच कार्यान्वित होते. जेव्हढे तुम्ही हृदयापासून कराल तेव्हढा जास्त आनंद तिथे असतो. तुम्ही जेव्हढे वास्तववादी आणि बौध्दिक असाल, तेव्हढा तिथे कांही नसेल.

## श्री माताजीच्या भाषणांतील कांही उतारे

प्रथम तुमची स्वच्छता महत्वाची आहे. पण तुमच्या आईकडे त्याचे क्षेपण्ग पाहिजे. ती उत्तुंगता हवी एकदां तुम्ही ती उत्तुंगता गांठली की तुम्ही सर्वशक्तिमान होता. नंतर सर्वांना देऊ शकता. ते देणं दुसरं कांही नाही पण अतिशय, अत्यंत, मी तुम्हांला सांगितल्यप्रमाणे फार परस्परांतर्गत आणि पूर्णपणे परस्परपूरक गोष्ट आहे. कारण देवीला तुमच्याबद्दल माहीती आहे, सर्व कांही, तुम्ही जर दुसरं कांही केलं तर तिला कळतं आणि ती तुम्हाला स्पष्टपणे सांगते सुध्दा की, हे करूं नये, ते करूं नये, साफ-साफ, कारण त्याबद्दल तुमची कांही चुकीची समजूत असूं नये. पण तरीही ते कार्यान्वित होण्यासाठी तुम्हांला कळायला हवं की ते परस्परावर अवलंबून आहे. एकाच बाजूने ते असूं शकत नाही. प्रामाणिकपणा एका बाजूने असूं शकत नाही. तो दोन्ही बाजूंनी असावा लागतो. मग तो चांगल्या प्रकारे कार्यान्वित होतो. आणि एक प्रकारचा सुसंगत भावना, आणि त्यासमवेत प्रेम प्रवेश करतं, - एक प्रकारचं वंगण आणि तुमच्यामध्ये सुरेख अशी चलनाची भावना येते.

पुजा खरं म्हणजे बंदुकीच्या चापासारखी, सुरूवातीचा जोर लावणारी गोष्ट आहे. ती तुम्हांला सुरूवातीचा जोर घ्यायला कारणीभूत होते. ती तुम्हाला दुस-या अवकाशांत घेऊन जाते. ते खरोखर चमत्कृति - पूर्ण आहे. एकदां तुम्ही पुजा केली की तुमच्या शांतीमध्ये तुम्ही जास्तीत जास्त क्षेपण करूं शकता तुमची शांतता स्वतःच इतकी शक्तिमान होते.

आतां आपल्या या आपल्या पाश्चात्य जीवनाच्या विशिष्ट बाबतीमध्ये, आपल्याला आपली अबोधिता प्रस्थापित केली पाहीजे. ते फार महत्वाचं आहे. ती पहिली गोष्ट आहे, ज्यावर हल्ला चढविला जातो. अबोधितेवर अनेक गोष्टीनी हल्ला केला जातो. तर आपल्याला आपली अबोधिता प्रस्थापित केली पाहिजे. आणि अबोधिता फार शक्तिशाली गोष्ट आहे. तिला कोणतेही वाईट दिसत नाही, कांहीही चूक दिसत नाही. तिला कांहीच दिसत नाही. ती प्रेम करते, आई द्वेष करते आहे, हे बालकाला कळत नाही, वडील द्वेष करतात कां, हे बालकाला समजत नाही. कोणीही द्वेष करतंय, हे बालकाला कळत नाही. ते अबोधितेत जगतात. आणि मग अचानक कधीतरी त्यांना शोध लागतो. आणि धक्का बसतो, लोक कसे आहेत - ते प्रेम करत नाहीत.

तर, गणेश पाश्चात्य देशांना फार महत्वाचे आहेत कारण सर्व कांही गोष्टीचे ते मूलतत्व आहे. मला वाटतं ती फार महत्वाची गोष्ट आहे. त्यासाठीच आपण प्रथम गणेशाची पुजा करतो. आणि प्रथम देवाने गणेशाची निर्मिती केली. कारण गणेश हा सर्वांत मोठा पुत्र आहे. तो प्रथम पुत्र आहे. तो तुम्हाला असलेला मोठा भाऊ आहे. आणि जरी कुमारला (कार्तिकियाला) नेहमीच मोठया भावाची वागणूक देण्यांत आली, आणि गणेश स्वतःला लहान भाऊ म्हणवतो, तरीही त्याची निर्मिती प्रथम झाली. कारण तो नेहमीच लहान असतो, कधीच वाढत नाही. त्यामुळे एक प्रकारे तो तुम्हां सर्वांहून लहान आहे. ही फार सूक्ष्मामधली जाणिव आहे. इतकी लहान, छोटी गोष्ट. किती सुज्ञतर आहे, तेच 'सूज्ञता' आहेत तुम्ही कल्पना करूं शकतां कां, लहान बालक इतकं हुषार - लहान बालक इतकं सूज्ञ, आणखीही कांही, वाढ

झालेल्या लहान बालकाप्रमाणे तो आहे. अतिशय परिपक्व, सूज्ञ लहान बालक. तर वयोमानाप्रमाणे तुम्ही त्यांच्याहून नेहमीच मोठे असाल. पण सूज्ञतेमध्ये तेच मोठे आहेत.

मग याप्रमाणेच, आपण आपल्यामधील सर्व दैवतांना कशा प्रकारे जागृत करतो ते तुम्ही समजून घेतलं पाहिजे. या कांही छोटया गोष्टी करून, कांही गोष्टी म्हणून त्यांचे मंत्र म्हणून, कारण आतां तुम्हाला जागृति मिळाली आहे. तुम्ही उच्चारलेला प्रत्येक शब्द जागृत असतो. आणि आतां "सिध्द" मंत्र असतो.

या गुरू पुजेच्या दिवशी मी तुम्हाला खरोखर सिध्द कसं करायचं, सिध्द कशा प्रकारे प्रस्थापित करायचं त्याचा मार्ग दाखविणार आहे. प्रत्येक चक्रामध्ये नैपुण्य कसं मिळवायचं त्यावरच्या आराध्य दैवतावर स्वामीत्व कसं मिळवायचं, कशाप्रकारे करायचं ते. मी तुम्हाला सांगते, पूर्ण विश्वासाने. ही गुरूपुजा सर्व कांही कार्यान्वित करेल. पण ही पुजा हे आपलं अत्यंत सुदैव आहे हे ओळखून आणि पूर्णपणे समजून घेऊन केली पाहिजे.

सर्व देवांनाही त्याबद्दल मत्सर वाटतो आहे आणि सर्व ऋषींनाही हेवा वाटतो आहे. हा तुमचा सर्वोच्च फायदा आहे मोठं सुदैव आहे. त्याचा पूर्णपणे उपयोग करून घ्या. आणि फार साध्या गोष्टी आहेत ज्या आनंद देऊ शकतात, फार साध्या गोष्टी, तुम्हाला माहीत आहे तुमची आई फार साध्या साध्या गोष्टीत खुष होऊं शकते. तसंच आहे ते. कितीसं हृद्य तुम्ही त्यामध्ये ओततां तो मुद्दा आहे.

त्यावर विचार करण्यापेक्षां त्यांत जास्त जाणवलं पाहिजे, समजून घेतलं पाहिजे, ओळखलं पाहिजे, कारण तुम्ही निर्विचार जाणिवेमध्ये जातां ती एक प्रकारची जास्तच जोर लावून कारणीभूत होणारी गोष्ट आहे.

-:- -:- श्री माताजीच्या भाषणांतील कांही उतारे -:- -:-

"पुजा आणि हवन यांचे महत्व"                                        18 जून 1983.

"इतक्या सा-या सहज योग्यांबरोबर इथे असल्यामुळे आणि त्यांतही बरेच जण मला एकदम नवीन आहेत, मी खूप आनंदात आणि खुष आहे. कदाचित हजारो वर्षांपूर्वी मी तुम्हांला ओळखीत असेन सहजयोगामध्ये तुम्हांला फक्त एक साधी गोष्ट समजावून घेतली पाहिजे ती म्हणजे तुम्ही आत्मा आहांत आणि जे कांही आत्मा नाही, ते तुम्ही नाही.

आपण आत्म्याची सुर्याबरोबर तुलना करूं शकतो. सूर्य ढगांनी झांकला जाऊं शकतो. त्याच्यावर कांही आच्छादन येऊं शकतं पण सूर्य तसाच राहातो, हा मुद्दा आहे. सूर्याला तुम्ही प्रकाश देऊ शकत नाही. तो स्वयंप्रकाशित आहे. आतां, जेव्हां ढग बाजूला होतात, आच्छादन काढलं जातं आणि सूर्य वातावरणांत प्रकाशतो, तसा आपला आत्मा दुर्लक्षाने आच्छादला आहे. जोपर्यन्त आच्छादन असेल तोपर्यन्य आत्मा दिसत नाही. आणि जेव्हां थोडे ढग बाजूला होतात तेंव्हासुध्दां आच्छादन असतंच. आत्म्याचा प्रकाश चमकतांना दिसण्यासाठी निरभ्र स्वच्छ आकाश पाहिजे अनेक प्रकार आहेत ज्यांनी आपण ढग दूर करूं शकतो.

पहिली, सर्व प्रथम गोष्ट म्हणजे, धारणा, श्रध्दा की आपण आत्मा आहोत आणि बाकी सर्व कांही आच्छादन आहे. हे तुमच्या अंतर्यामी तुम्ही धारण केलं पाहिजे. आत्म साक्षात्कारानंतर हे फार सोपं झालं पाहिजे. , की तुम्ही कांही तरी जास्त आहांत अजूनपर्यन्त माहीत असलेल्यापेक्षां त्यापेक्षां तुम्ही कांहीतरी फार वेगळे आहांत.

तर आतां नवी परिस्थिती उद्भवते की तुमच्या मध्ये अंधश्रध्दा नाही, पण तुमच्यामध्ये श्रध्दा आहे जी अनुभवांतून उत्पन्न झाली आहे. तेंव्हा तुमच्या बुध्दीने त्याच्याशी लढतां कामा नये. बुध्दीने त्याला आव्हान देण्याचा प्रयत्न करतां नये. जर तीने त्याला आव्हान देण्याचा प्रयत्न केला आणि तुम्ही तुमच्या बुध्दीचं ऐकलं तर तुम्ही पण खाली जाल. आकाशामध्ये ता-याचं नुसतं ओझरतं दर्शन झालं तर शास्त्रज्ञ विश्वास ठेवतात की तारा अस्तित्वांत आहे. तर त्याच प्रकारे, तुमच्या आत्मसाक्षात्काराचं तुम्हाला ओझरतं दर्शन झालं, तरी तुमचा कमीत कमी विश्वासतरी बसला पाहिजे की तुम्ही सुध्दां आत्मा आहांत.

त्या अनुभवाला तुम्ही चिकटून रहा. तुम्ही आत्मा आहांत या वस्तुस्थितीवर तुमचं चित्त ठेवा. तुमची आतां जास्त फसवणूक करायची नाही असं तुमच्या बुध्दीला बजावा. यामुळे तुमच्या बुध्दीचा चेहराच तुम्ही बदलूं शकता.

आतां तुमची बुध्दी आत्म्याचा पाठलाग करण्यासाठी कार्यान्वित होईल. विश्वास म्हणतात तो हा. विश्वास शुध्द बुध्दीचा उगम करतो. आतां एकदां तुम्ही ढग बाजूला केलेले पाहिले तरी अजूनही ढग आहेतच. तर तुम्हाला ढग काढायला वा-याचा वापर केला पाहिजे, आदिशक्तिचा वारा. आणि ते तुम्हांला माहीत आहे - वा-याचा फायदा घेण्याचे अनेक मार्ग आहेत. तर वारा दुस-या कोणत्यातरी उगमस्थानातून येईल. आणि ते म्हणजे आदिशक्तिचे स्त्रोत, तुमची स्वतःची कुंडलिनी, आणि तुमच्यासमोर व्यक्तिशः आदिकुंडलिनी उभी आहे. तुमच्या आधी येऊन गेलेल्या अनेक साधकपिक्षा तुम्ही खूप नशिबवान आहांत. कारण कोणत्याही 'विग्रहाची पुजा केल्यामुळे - पृथ्वी मातेच्या व्हायब्रेशन्सनी निर्माण झालेला स्वयंभू पुतळा - लोकांना खूप अडचणी आल्या. प्रथम त्यांना ज्याला सविकल्प समाधी म्हणतात तशी ध्यान धारणा करावी लागली, त्याचा अर्थ त्या स्थितीमध्ये तुम्हाला त्या विग्रहाच्या स्थितीवर लक्ष केंद्रीत करावं लागे.

"विग्रह" म्हणजे व्हायब्रेशन्स असणारा पुतळा. आणि मग त्या पुतळयाकडे बघत राहायचं आणि तुमची कुंडलिनी वर उचलण्याचा प्रयत्न करायचा. आणि कुंडलिनी आज्ञापर्यन्त येत असे पण सहस्त्रारावर उडी मारण्यांच काम अशक्य होतं. कारण आपल्याला साकारांतून निराकाराकडे जावं लागेल आणि साकारातून बाहेर पडून निराकाराकडे जाण किती कठीण होतं, आणि अमूर्तावर किंवा निराकारावर लक्ष केंद्रीत करणंसुध्दां अशक्य काम होतं जसंमुसलमानांनी केलं किंवा इतरांनी करण्याचा प्रयत्न केला. या सर्व परिस्थितीमध्ये निराकाराला साकाराचं रूप घेणं जरूरीचं होतं. म्हणजे त्यांत कांही अडचणी नसल्या, साकारावर लक्ष केंद्रीत केलं, की तुम्ही निराकार होत जाता. जसे तुमच्या समोर बर्फ असला तर तुम्ही बर्फाला स्पर्श करूं लागला की तो वितळूं लागतो आणि तुम्हांला थंड वाटूं लागतं.

तर आता प्रश्न फार सहजगत्या सोडविला गेला आहे. पुजा ही एक गोष्ट आहे ज्यायोगे तुम्ही साकाराला,निराकारामध्ये बदलू शकता. आतां तुमच्या चक्रांवर शक्तीची चक्रं आहेत. पण त्या चक्रांवरही या सर्वांना मार्गदर्शन करणारी दैवते बसली आहेत. ती सुध्दां निराकार साकार स्वरूपांत आलेली आहेत. आणि जेंव्हा तुम्ही पुजा करतां, तेंव्हा साकार निराकार शक्तिमध्ये विरघळतात. आणि या निराकार शक्त्या वाहूं लागतात. आणि त्यानंतर वारा वाहूं लागतो, आणि अशा प्रकारे ही चुकीची ओळख, या आत्म्यावरचे आवरणं दूर केली जातात.

आतां तुम्ही पुजेविषयी विचार करूं शकत नाही. या गोष्टी अशा आहेत ज्या अशा प्रदेशांत घडतात,जो विचारांच्या पलिकडे आहे.

तर तुम्हांला समजलं पाहिजे की पुजा तुम्ही युक्तिवादांत बसवूं शकत नाही: तुमच्या चक्रांवर तुम्हांला जास्तीत जास्त फायदा करून घेतला पाहिजे. त्यासाठी तुम्ही पुजेवर पूर्णपणे लक्ष केंद्रीत केलं

पाहिजे. आणि वारा कसा वाहात आहे त्याकडे, आणि वाराच त्याकडे लक्ष देईल की सर्व ढग कसे चालवायचे. तर (तुमचं काम फक्त हेच की - तुमची पध्दत हीच की - पुजेवर लक्ष द्यायचं आणि साक्षीस्वरूपांत रहायचं. तुम्ही द्रष्टे आहांत).

"द्रष्टा" याचे दोन अर्थ आहेत. तो जो बघतो. फक्त बघतो आणि तो 'ज्ञान' असतो. तो द्रष्टा असतो विचार न करतां, प्रतिक्रिया न येता, बघतो आणि आपोआप आत्मसात करतो. सहजच तो द्रष्टा असतो. कधी कधी मला हे बोज्यासारखं होतं. कारण तुम्ही आणि दैवतं यांच्यामध्ये कांहीतरी समानता हवी, कांही तरी समतोलपणा हवा.

इथे तुम्ही सगळे मंत्र म्हणत असतां दैवतं जागृत झाली असतात आणि तिथे तुम्ही ज्यांना तुमच्या हृदयामध्ये कशाचाही स्विकार करायचा नसतो. त्यामुळे मीच एक आहे, जिला माझ्या शरीरांत उत्पन्न झालेली ज्यादा शक्ति सांठवून ठेवावी लागते.

तर तुम्ही तुमची हृदयं उघडी करून विचार न करता पुजा पाहिली तर बरं होईल. आज आपण पुजेची पध्दत उलट करूं या. प्रथम आपण हवन करूं आणि नंतर पुजा. ते बरं होईल. कारण आपण अग्नितत्व जागृत करूं, जे सर्व दुष्ट शक्तिंना जाळून टाकेल. जेंव्हा तुम्ही माझे चरण धुता तेंव्हा तेच करतां आणि अग्नि जागृत करता तेंव्हांही तेच करता.

आज प्रथम आपण हवन करूंया. मग पुजा. दोन्ही सारखेच आहे. तुम्ही माझी पुजा पाण्याने करूं शकता किंवा अग्निने. अग्निचं तत्व-त्याचा प्रकाश आहे, सर्व कांही जे अयोग्य आहे, सर्व कांही जे दुष्ट आहे, ते जाळलं जातं आणि त्याचा प्रकाश साधकांच्या चेहऱ्यावर आणि शरीरावर दिसून येतो आणि तुम्ही हवन करता तेव्हां वातावरणसुध्दां सुंदर व्हायब्रेशन्सनी भरुन जातं .

ईश्वर तुम्हांला आशिर्वाद देवो.

## श्री माताजींच्या भाषणांतील कांही उतारे

"पुजेचे महत्व" 24 मे 1986 रोजी माद्रिद

अगदी आधीच्या ख्रिश्चन लोकांमध्येसुध्दां मेरीच्या पुतळयाची आदर दर्शवणारी पुजा करीत होते. पुतळयाची किंवा फोटोची, किंवा आपण म्हणूया ख्रिस्ताच्या आईच्या रंगीत काचेवर उपलब्ध असणा-या फोटोची.

पण नंतर लोक जास्त बुध्दीवादी होऊ लागले आणि पुजेचं महत्व काय हे त्यांना समजेना, आणि जेंव्हा त्यांना ते विषद करता येईना तेंव्हा त्यांनी नेहमीप्रमाणे पुजेचं कौतुक करणं सोडून दिलं ख्रिस्ताआधी सुध्दा एका विशिष्ठ प्रकारचं "टर्व्यानिक्कल" जे ठराविक मापाचं,मुद्दाम पुजेसांठी केलेलं होतं. आणि ज्याला ते **जेहोव्हा** म्हणतात, त्याची पुजा करण्यासाठी पुजेची जागा तयार केली असे. आतां हा **"जेहोव्हा"** म्हणजे सहजयोगामध्ये **"सदाशिव"** आणि **मदर मेरी** ही **महालक्ष्मी.** तिचे आधीही अवतार झाले होते. ती **सीता** म्हणून अवतीर्ण झाली. आणि नंतर **राधा** म्हणून मग **मदर मेरी** म्हणून देखील. आतां **ख्राइस्ट**च्या जन्माबद्दल या पुस्तकांत,ज्याचं नांव "देवी महात्म्य" आहे त्यामध्ये स्पष्टपणे लिहीलं आहे. तो राधेचा पुत्र होता. **राधा** ही **महालक्ष्मी** आहे. तेंव्हा दुस-या स्थितीमध्ये त्याचा जन्म झाला - अंडं म्हणून आणि अर्ध अंडं **श्री गणेश** म्हणून अवतीर्ण झालं आणि त्याचा अर्धा भाग **महाविष्णु** झाला, जो आपला देव **जिझस ख्राइस्ट** आहे.

**जिझस ख्राइस्टचं** सर्व वर्णन त्यांत दिलं आहे. त्या महाविष्णुच्या सर्व वर्णनासारखं, हुबेहूब जुळतं. आता ही **महालक्ष्मी** या पृथ्वीवर आली. आणि तिने पूर्वी राधा म्हणून केलं होतं, त्याप्रमाणेच पवित्र गर्भधारणेने तिचं मूल या जगांत आणलं. अशा प्रकारे ख्राइस्ट हा महान विराटाचा पुत्र आहे, खरे म्हणजे **विष्णु, महाविष्णु** विष्णूचा **विराट** होतो. आतां हे **विष्णूतत्व विराट** होतं आणि तो **राम** आणि **कृष्ण** होतो, नंतर **विराट** होतो. म्हणजे - अकबर. तर ख्राइस्ट म्हणजेच स्वत:च **ओंकार** आहे. म्हणजेच व्हायब्रेशन्स आहे. बाकी सर्व अवतारांना पृथ्वीमातेकडून तत्व किंवा मूलतत्व घ्यावी लागली - त्यांचे शरीर बनवण्यासाठी. अपवाद आहे, **ख्रिस्ताचं** शरीर. जे पूर्णपणे **ओंकार** आहे आणि पृथ्वीतत्व जे **श्री गणेशांचं.**

तर आपण असं म्हणूं शकतो की **ख्राइस्ट** ही **श्री गणेशा** ची शक्ति आहे जिचा अवतार झाला. तर तेच कारण होतं ज्यामुळे ते पाण्यावर चालूं शकत होते. तर तो दैवताचं सर्वांत शुध्द स्वरूप आहे. कारण ते फक्त व्हायब्रेशन्स आहेत तर **जेव्हां तुम्ही माझी पुजा करतां** कारण मी व्यक्तिरूपांत आहे तेंव्हां त्यांत कांही नाही. असत्य कांही नाही.

जर त्यांनी ख्राइस्टची पुजा केली असती तर, त्यांनी केली पाहिजे, त्यांनी ख्राइस्टची सुध्दां पुजा केली आहे. जेव्हां ते अस्तित्वांत होते आणि त्यांच्या आईचीसुध्दा असं म्हणतात, "टेन कमांड मेण्डस" मध्ये सांगितले आहे की जे कांही स्वर्गांतून आणि पृथ्वीमधून निर्माण झालं आहे ते परत निर्माण करू नये. परत उत्पादन आणि पुजा करु नये पण पूर्वीच्या दिवसांत तसं होण्याची शक्यता नव्हती. आतां जे कांही पृथ्वीमातेने तयार केलं आहे, पृथ्वीमातेमधून वर आलं आहे - जे स्वयंभू - भूमीमातेचे निर्मिती आहे, आतां सगळीकडे आपल्याला स्वयंभू गोष्टी सांपडतात. दुसरी गोष्ट म्हणजे कांही आत्मसाक्षात्कारी लोकांनीसुध्दा काही सुंदर पुतळे तयार केले आहेत.

मी पोर्तुगालला गेले होते आणि त्यांच्याकडे "लेडी ऑफ रॉकस" चा सण होता. म्हणून मी ते स्थळ पहायला गेले. आणि तिथे खूप लहान, छोटा सा या उंचीचा मेरीचा पुतळा होता. साधारण पांच इंचाचा आणि चेहरा अगदी माझ्यासारखा होता. आणि ते म्हणाले की हा अचानक दोन लहान मुलींना सांपडला ती एका कपारित लपलेल्या सशामागे जात होती. ती दगडामागे जाऊ लागली आणि ते प्रकाश जियून येत होता - हा पुतळा होता - तिथे पोहोचले. तो त्यांनी बाहेर आणला आणि त्या प्रकाशांत ती मुलं चालत आली आणि बाहेरचे लोक, बरेच लोक जमले होते, आंतुन कुठून तरी आणलेला तो पुतळा पाहून आश्चर्यचकित झाले.

म्हणून त्या जागी त्या पुतळयाची ते पुजा करतात. आता हा पुतळा व्हायब्रेशन्स देतो. जशी मी तुम्हाला व्हाब्रेशन्स देते. पण मी तुम्हांला देते तेंव्हढी नाही, आणि इतरही पुतळे आणखी बरेच असतील, जे व्हायब्रेशन्स देतात. भारतांत सुध्दां जसं तुम्हांला माहीत आहे, आपण गेलो होतो, तुमच्यापैकी कांही गणपतीपुळेला गेले होते, तिथे गणेश आहे, जो वर आला आहे - महागणेश - हा ख्राइस्ट - भूमातेमधून वर आलेला आहे. महागणेश म्हणजे शरीराचा खालचा भाग तिथे आहे आणि पूर्ण पर्वत हे डोकं आहे आणि तिथे समुद्राचं पाणीसुध्दा गोड आहे. तिथे अनेक गोड पाण्याच्या विहीरी आहेत.

तुम्हांला आठवत असेल माझा तिथे एक फोटो घेतला होता. खूप लोकांनी फोटो घेतले होते आणि कांही फोटोंमध्ये माझ्या हृदयामधून प्रकाश बाहेर येत आहे. आणि कांही जणांनी मला सांगितलं कांही फोटोंमध्ये प्रकाश नव्हता पण त्यांनी ते परत घेतले म्हणजे निगेटिव्ह बदलून परत फोटो घेतला तेव्हां त्यामध्ये प्रकाश आला.

तेव्हां आपल्याला कळलं पाहिजे की देवाच्या राज्यांत सर्व प्रकारच्या चमत्कारिक गोष्टी होतात पुजेचंसुध्दां तसंच आहे. आतां जेव्हां आपण पुजा करूं तेव्हां पहिल्यांदा तुम्ही श्री गणेशाची स्तुति कराल ज्या योगे तुमच्यामध्ये श्री गणेश जागृत होतील आणि प्रस्थापित होतील. श्रीगणेश म्हणून माझी

पूजा करतांना तुमची अबोधिता प्रस्थापित होईल. आणि तुम्ही पहाल, व्हायब्रेशन्स वाढतील. तुमची व्हायब्रेशन्ससुध्दां वाढतील आणि तुम्ही तुमच्या स्वत:मध्ये स्थिर झाल्याचं तुम्हांला जाणवेल.

आतां तुम्ही श्री गणेशाची नावं घ्याल तेंव्हां त्याचे काय गुण आहेत ते तुम्हांला कळेल. कोणत्या शक्त्या ते तुम्हांला देतात जेंव्हा त्या शक्त्त्यांची तुम्ही स्तुती कराल, त्यावेळी त्या शक्त्त्या तुमच्यामधून प्रसारित होऊं लागतील. अशा प्रकारे दैवी कार्य होतं. जसं कांही तुम्ही त्या गुणांनी ओतप्रोत भरून जाता. मग तुम्ही देवी आदिशक्तिची स्तुति करता.

आतां आदिशक्तिकडे तिच्यामधील सर्व सात चक्रे जागृत झालेली आहेत. आणि या सर्व सातही चक्रांनी तिला काम करावं लागतं. प्रथमच असं अवतरण आलेलं आहे. ज्याप्रमाणे तुम्ही पहिल्यांदा एक खोली करतां, मग दुसरी खोली, मग तिसरी खोली - सात खोल्या आणि मग पूर्ण घर तयार होतं तसं आहे. तुम्हांला चाव्या मिळतात, तुम्ही घर उघडता - ते तुमचं असतं. तशा प्रकारे जनसमुदायाचा आत्मसाक्षात्कार मी मिळवूं शकले. आधी तसं होऊं शकलं नाही. पण आतां हे होऊं शकतं कारण या सात चक्रांच्या योग्य जुळवणीमुळे. तर आतां जेव्हां तुम्ही आदिशक्तिची स्तुति करतां, मी महामायासुध्दां आहे कारण मी तुमच्यासारखी दिसते. तुमच्यासारखी वागते. मी मला हुबेहुब तुमच्यासारखं केलं आहे. फार कठीण आहे बनवायला. पण मी ते केलं आहे. आणि तुम्ही सहजयोग समजून घ्यावा, तुमच्या स्वत:च्या शक्त्या समजावून घ्याव्या यासाठी या माझ्या शरीराला अनेक गोष्टी सहन कराव्या लागतात.

उदाहरणार्थ तुम्ही माझ्याशी उध्दटपणे वागलात, तुम्ही आदरपूर्वक वागत नसाल तर ख्राइस्ट खूप रागवतो. कारण त्याने म्हटलं आहे की, "होली घोस्ट" च्या विरूध्द कांहीही तो सहन करणार नाही त्यामुळे माझी चक्रे, आज्ञा, राग ओतायला सुरूवात करते. आणि फार जलद वाहते, मला ते सहन करावं लागतं. ख्राइस्टला, मी कशाप्रकारे तुम्हांला सांगावं असं जे वाटतं, ते मी तुम्हांला सांगूं शकत नाही. कारण तो फार सरळ आहे. आणि तुम्ही अपसेट होऊ नये म्हणून मला काळजी घ्यावी लागते. त्यांतून ही पूजा करतांना समजा, तुम्ही शंकेखोर असाल किंवा विरोध करीत असाल, आणि तुम्ही व्हायब्रेशन्स शोषून घेतली नाहीत, आणि मला त्रास होतो कारण व्हायब्रेशन्स वहात असतात, तुम्ही स्विकार करत नाही, आणि तुम्ही जर व्हायब्रेशन्स शोषून घेतली नाही तर ती माझ्यांतच कशी सांठवायची ते मला कळत नाही त्यामुळे ती बाहेर सोडायला मी वेळ घेते. तेंव्हां या सर्व गोष्टी फार प्रतिकात्मक आहेत. आपण जे काय करतो आहोत ते फार प्रतिकात्मक आहे. आणि ते प्रतीक खरोखर कार्यान्वित होतं. उदा. तुम्ही कोणाला फूल दिलं, त्या व्यक्तिला खूप आनंद वाटतो, मजा वाटते, कृतज्ञता येते तर जेंव्हा कोण मला कांही देतं, फुलं किंवा पाणी, किंवा कांही तेंव्हा मूलतत्व खूष होतात आणि चक्रांवरची दैवतं खूष होतात. आणि मग ती त्यांच्या गुणधर्माचे व्हायब्रेशन्स उत्सर्जित करतात. आणि त्यांचे आशिर्वादितें तुम्हांला देतात.

ती दैवतं त्यांचे गुणधर्म आणि आशिर्वाद तुम्हांला देतात. तशा त-हेने दैवीशक्ति कार्य करते आणि हळूंहळूं पुजेनंतर तुम्हांला जाणीव होते की सर्व गोष्टी होत चालल्या आहेत.

आतां आपण या वेळी पुजा करीत आहोत. आणि जगभर लोकांना माहीत आहे की इथे आतां पुजा चालली आहे. त्यामुळे ते सुध्दां ध्यानामध्ये बसले आहेत आणि त्यांना सुध्दां आशिर्वाद मिळतील. ते सुध्दां या क्षणासाठी थांबले आहेत की, केव्हां पुजा सुरू होते. आपण त्यांना वेळ देतो जसं 11 वाजता वगैरे - 11 नंतर आपण बसलं पाहीजे. ते अकराला सुरूवात करणार, आतां त्यांना तेच आशिर्वाद मिळतात, जरी पुजेला तुम्ही बसला आहांत पण त्यांनासुध्दा ध्यानामध्ये तेच आशिर्वाद मिळतात.

जर तुम्ही अजून इतके हुषार नसाल आणि तुम्हांला माहीत नसेल त्या थोडया गोष्टी ज्या पुजेमध्ये महत्वाच्या आहेत. तरी हरकत नाही, कारण जर तुम्ही त्याविषयी अज्ञानी असाल, अबोधित असाल तर देवाला माहीत असतं, तो क्षमा करतो. तो मनावर घेत नाही. तुम्ही जर एखादी चूक केली तर मनाला लावून घेऊं नये नुसत्या विनयशील हृदयाने तुम्हाला हव्या त्या प्रकारे करा. हळूंहळूं तुम्ही शिकाल. पण तुम्हांला माहीत असेल आणि तरीही तुम्ही मुद्दाम चुका करीत असाल तर ते चांगलं नाही आपण आपल्या मुलांना क्षमा करतो तशीच देव देखील त्याच्या अबोध मुलांना क्षमा करतो. तर त्याबद्दल तुम्ही अगदी स्वस्थ रिलॅक्स असा फक्त तुमच्या हृदयाच्या आनंदासाठी करा.

**ईश्वर तुम्हांला आशिर्वाद देवो.**

18 डिसे. 1989 गणपतीपुळे.

"मी आदिशक्ति आहे यावर आतां तुम्ही सर्व विश्वास ठेवत आहांतच आणि त्याचा पुरावा सुध्दां तुमच्याकडे आहे. पुजा ही सुध्दा एक पध्दत आहे ज्यायोगे तुम्हांला त्याचा पुरावा मिळतो. जास्तच कारण, माझ्या चक्रांमध्ये असलेल्या माझ्या दैवतांची तुम्ही जेव्हां पुजा करतां त्यावेळी ती उत्साहित होतात आणि आनंदी होतात, कारण त्यांना जास्त व्हायब्रेशन उत्सर्जित करायची असतात. जेव्हां ती जास्त

व्हायब्रेशन्स उत्सर्जित करतात., त्यावेळी तुम्हांला आश्चर्य वाटतं की कसं काय पुजेनंतर तुम्ही नुसते भिजून चिंब झाल्यासारखे होतां आणि नंतर वर उचलले जातां आणि ते सुध्दां खूप उच्च स्तरावर ।

अर्थात हे खरं आहे की पुजेच्या वेळी तुम्हांला फार वर गेल्यासारखं वाटतं आणि थोडा वेळ तुम्ही ती स्थिती ठेऊं शकतां. कांही लोक नक्कीच ती धरून ठेवतात. पण लोक यो - यो सारखे वरखाली जातात. त्याच्यामध्ये ती स्थिती धरून ठेवण्याची क्षमता नसते. म्हणून प्रत्येकाला ती स्थिती पकडून ठेवण्यासांठी निर्विचार समाधी मध्ये ध्यान केलं पाहिजे. पण फक्त देवीची पुजा करण्याला परवानगी आहे. देवाची पुजा करूं शकतो पण आपल्याला जाणलं पाहिजे की देव कोण आहे, किंवा देवी कोण आहे.

तेंव्हा प्रत्येक व्यक्तिची आंधळेपणाने पुजा करणे, कोणीही पुढे येतो, हे नाहीतर ते म्हणतो, हे स्वीकारु नये. तुम्हांला आश्चर्य वाटेल पहिली चार वर्षे मी त्यांना कसल्याही प्रकारची पुजा करण्याची परवानगी दिली नाही ते असं सुध्दा म्हणाले की "तुम्ही आमचे गुरू आहांत, आम्हांला तुम्ही गुरू पुजा करायला दिली पाहिजे." मी म्हटलं "कांही चालणार नाही , मी देणार नाही." मग पहिल्यांदा, चार वर्षानंतर, नवरात्रीच्या दिवशी त्यांना एक पुजा करायची होती. मी म्हटलं "ठीक आहे, तुम्ही करा." पण फार थोडी लोकं. मग त्यांना आढळून आलं की पुजेने त्यांना किती जास्त व्हायब्रेशन्स दिली, अध्यात्मिकतेची पातळी किती उंचावली, आणि त्यांनी अकस्मात किती वेगवेगळया स्तरांना स्पर्श केला. मग ते मला विनंती करूं लागले"श्री माताजी तुम्हांला एक पुजा घ्यायलाच पाहिजे" लोकांना कल्पना नव्हती, खरोखर ती कशी करायची त्याची. ते फार संकोच देणारं काम होतं. पण मला त्यांना प्रत्येक गोष्ट सांगावी लागली. हे असं करा ते तसं करा. हे असं असलं पाहिजे, मला अशा प्रकारे नेहमी करवून घेतलं पाहिजे.

पहिल्यांदा मी दिल्लीला गेले तेव्हां, तुम्हांला आश्चर्य वाटेल, तो फोटो जर कोणाला मिळाला तर मी नुसती बारीक झाले होते मी नुसती आटल्यासारखी झाले होते सर्व शरीर आकुंचित झालं होतं मी इतकी बारीक झाले होते आणि मला इतका धक्का बसला होता, कारण ते सर्व प्लास्टिक वापरीत होते. आणि वापरांतल्या गोष्टी वापरित होते. "अरे देवा", मी म्हटलं "आतां काय करायचं" तेव्हां मी त्यांना मला कांहीही पैसे किंवा कांहीही अर्पण करायला देऊ देत नसे. मग मी म्हटलं "ठीक" आहे. एका पैने सुरुवात करा." मग त्यांनी एका पैने सुरुवात केली आणि हळूंहळूं त्यांनी वाढविलं, कारण मला वाटलं त्यांना चांदी वापरायची असते, हे माहीत नसेल. मी त्याच्यावर माझं नांव घालीन म्हणजे ते माझं धन होईल, म्हणजे जे कांही तुम्ही द्याल ते माझं होईल - तथाकथित - आणि तुमच्याकडे राहील.

-------------------------------------------------------------

## -०- -०- श्री माताजींच्या भाषणांतील कांही उतारे -०- -०-

-------------------------------------------------------------

तशाप्रकारे आपण योग्य समजणूकीला सुरुवात केली की आपण ठराविक प्रकारचा धातु वापरला पाहिजे आणि ठराविक पध्दतीने. आता या धातूंचा आपल्यावर प्रभाव पडतो आणि कोणत्या धातूने आपण पुजा करतो त्याचासुध्दा प्रभाव पडतो. हे सर्व अध्यात्माचं सायन्स आहे. जे फार महत्वाचं आहे हे आपण समजून घेतलं पाहिजे. आणि उत्तम परिणाम हवे असतील, तर योग्य प्रकारे केलं पाहिजे. हे शास्त्रासारखंच आहे. आणि अशाप्रकारे पुजेची सुरुवात झाली. मला वाटतं लोकांना आतां त्याच चांगलें आकलन झालं आहे. आता मुख्यतः महाराष्ट्रात ते निष्णात झाले आहेत. त्यांच्याबरोबर वादविवाद करणं फार कठीण आहे. तर ते म्हणाले, " श्री माताजी आम्ही तुम्हांला साडी द्यायची असते तर मी म्हणलं, " मला साधी साडी द्या, फार महागाची मी घेणार नाही". तर याच्याबद्दल ,त्याच्याबद्दल माझ्याशी वाद घालत बसले. ते वाढत, वाढत वाढतचं गेलं आणि इथपर्यन्त आलं की, " आम्ही तुम्हांला खोटी साडी देऊ शकत नाही". मी म्हटलं "ठीक आहे. द्या मला साडी. कांहीही" आणि आतां ते इतकं महाग झालयं. आता तुम्ही पहा, मी तुम्हाला विनंती करतेय की,आता यापुढे लक्षात घ्या, की आतां माझं वय झालयं, आणि वयोवृध्द देवीसाठी तुम्ही कांहीतरी साधं घेऊ शकतां. पण कोणीही ते स्वीकारायला तयार नाही. आता आपणाही इतके वाढलो आहोत की ठीक आहे पाहू या कसे काय आपण एकमेकांशी सुसंगती मिळवतो.

तर हे सगळं असं आहे. त्याने फरक पडत नाही. पण एका रीतीने पडतोसुध्दां, की तुम्हांला जे करायची इच्छा असते,त्याला तुम्ही किती महत्व देता, ते फार महत्वाच आहे पूर्ण चित्त समर्पण आणि पूर्ण महत्व जे तुम्हाला करायचं आहे, त्याला तुम्ही देता, ते फार महत्वाचं आहे. जर तुम्ही त्याला सर्वोच्च , अग्रस्थान दिलं नाही,तर ते कार्यरत होत नाही. जर नुसतं जातां जातां केलं असेल तर ते कार्यान्वित होत नाही.

तर हे समजणं फार महत्वाचं आहे की,तुम्हांला पुजेमध्ये कांही मिळवायचं असेल तर त्याला सर्वात जास्त प्राधान्य दिलं पाहिजे. आणि मग जर पुजेच्या जरा आधी तुमचं मन तुम्हांला कांही सांगत असेल किंवा शंका काढीत असेल, तर त्याला थांबवा. कारण मन तुमच्या विरुध्द वागू शकतं. तर पुजेसाठी तुम्ही सर्व तयारी करुन आलं पाहिजे. स्वीकारण्याची तयारी करुन आणि स्विकारलं पाहिजे".

= = = = = = = = =

'पुजेतून मिळणारे आशिर्वाद'याविषयीच्या श्री माताजींच्या जुन्या पत्रांतून घेतलेले उतारे -

"पुजा हे बाहयांतील अर्पण आहे पण कशाप्रकारे पुजेचे फल स्वरुप आशिर्वाद आणि तिचा प्रसाद तुम्हाला मिळतो ते तुम्ही समजून घेतलं पाहिजे. पुजा किंवा प्रार्थना तुमच्या हृदयांतून वाहूं लागते. मंत्र हे तुमच्या कुंडलिनीचे शब्द आहेत. पण जर पुजा तुमच्या हृदयापासून केली नसेल, किंवा मंत्रोच्चारणाबरोबर कुंडलिनीचा संपर्क नसेल तर पुजा हा नुसता धार्मिक विधी होतो.

जर तुम्ही पुजेमध्ये निर्विचार झालांत, तर तुमचं हृदयही त्यांत गुंतलं आहे हे तुम्हांला कळेल. पुजेचं समान गोळा करा आणि मनोभावाने अर्पण करा. त्यांत कांहीही औपचारिक नको किंवा अर्पण करण्यांत बांधीलकी नको हात धुणं हे योग्य आहे पण तुमचं हृदय धुतलेलं आहे कां ? जेंव्हा चित्त हृदयावर असतं तेंव्हा हे दुसरीकडे जात नाही. तुम्ही जरी बाहेरून शांत असलां तरी आंतून तुम्ही बोलत असता म्हणून तुम्ही जास्त वेळ शांत असतां कामा नये, जर माणसाचं हृदय स्वच्छ नसलं तर शांतता फार धोकादायक ठरते. त्याच वेळी वाटेल तसं बोलणं संकटं आणूं शकतं.

पुजेमध्ये तुम्ही मंत्र म्हटले पाहिजेत परंतु श्रध्दापूर्वक, श्रध्देला पर्याय नाही. श्रध्दा खोलांत जाते, तेंव्हा तुम्ही पुजा केली पाहिजे म्हणजे मग हृदयच सर्व पुजा करेल आणि त्यावेळी निरानंदाच्या लाटा वाहूं लागतील कारण तो आत्मा आहे, जो म्हणतो आहे, की त्यावेळी कोणताही विचार कसा येऊ शकेल ? .

लोक ग्लासमध्ये वाइन ओततात. तुमची पुजा त्या प्रमाणेच आहे. त्यामध्ये वाईन ही तुमची श्रध्दा आहे. आणि ग्लास म्हणजे मंत्रोच्चारण आणि पुजा करणे. आणि सगळं विसरून तुम्ही जेंव्हां ही वाइन पीत असतां तर विचार कसा येईल ! त्यावेळी फक्त आनंद सागरांत नहाणं तो आनंद विचारांत प्रदर्शित करणे कसं शक्य आहे ? कोण ती वाइन परत ग्लासमध्ये ओतेल, जी परत प्यावयाची आहे ? आणि ती सुध्दां विचारांच्या कमी दर्जाच्या ग्लासमध्ये तरी पण ही वाइन प्यायल्यावर तुम्हांला मिळणारा आनंद अक्षय आणि सदैव राहाणारा असतो. तो तुमचा ठेवा बनतो.

माझ्या उपस्थितीत अशा अनेक पुजा झाल्या आहेत. प्रत्येक वेळी एक मोठी लाट येते आणि तुम्हांला नव्या जागी घेऊन जाते. अशा अनेक जागांच्या अनुभुति तुमच्या स्वतःच्या होतात. त्या व्यक्तित्वाला विस्तिर्णता देतात आणि आनंदाची नवी कवाडं उघडतात.

हृदयामध्ये पुजा करणं सर्वांत उत्तम जर फोटो त्याच्याकडे पाहून हृदयामध्ये ठेवता आला, किंवा पुजेनंतर ते दृश्य हृदयामध्ये राहिलं, तर तो आनंद जो तुम्हाला त्यावेळी मिळतो तो नित्य आणि सदैव रहाणारा बनूं शकतो.

" देव तुम्हांला आशिर्वाद देवो "

## पुजेच्या वेळचा प्रोटोकॉल

अनुभव आणि आपल्या आईच्या आशिर्वादांमुळे कांही मार्गदर्शक सुचना ज्या आपल्या आईच्या पुजेप्रसंगी आपल्यापैकी प्रत्येकाने आचरणांत आणाव्या, त्या आहेत ज्यांच्यामुळे आपल्याला पुजेमध्ये जास्तीत जास्त लाभ व्हायला मदत होते.

जेव्हां श्री माताजीची व्यक्तिगत रूपांत पुजा करण्यासांठी हजर रहाण्याइतके आपण नशिबवान असतो, तेंव्हा नेहमीच आपण श्री माताजी येण्या आधी पुजेच्या स्थळी एकत्र झाले पाहिजे. त्या येईपर्यन्त सर्वांनी बंधन घालून ध्यानामध्ये बसले पाहिजे. जेंव्हा श्रीमाताजीचे आगमन होते तेंव्हा सर्वांनी आदरपूर्वक उभे राहिले पाहीजे. श्री माताजींनी स्वतःच्या स्थानावर स्थानापन्न झाल्यानंतरच प्रत्येकाने आपापल्या जागेवर बसावे. पूजेला बसण्यासांठी आपण कदाचित खूप वेळ बसून राहूं तेव्हां आपल्या चित्ताला मदत करण्यासाठी आधीच कांहीतरी खाऊन येणे आणि सैल कपडे घालणे चांगले.

फक्त कांही प्रतिनिधीच श्री माताजीची पुजा करतील, आपण पुजा करीत नाही म्हणून कोणत्याही प्रकारे खेद मानून घेण्याचं कारण नाही. सहज योगामध्ये सर्व कांही विधात्याने पूर्व नियोजित केलं असते म्हणून आपण प्रथम बसतो ती जागा कारणाशिवाय सोडूं नये. श्री माताजीपासून आपण लांब असलो तर आपण चिंता करू नये. परमेश्वराने आपल्याला दिलेली जागा ही आपल्या देवाच्या शोधांतील उन्नतीसांठी योग्य जागा असते. आपला शारिरीक जवळपणा हा महत्वाचा नसतो तर आपली गहनता महत्वाची असते.

सहजयोग सामुहिकतेवर उभा आहे आणि श्री माताजीच्या पुजेच्या वेळी श्री माताजी व्हायब्रेशन्स उत्सर्जित करतात आणि पुजेसाठी निवडलेल्या प्रतिनिधींच्या माध्यमातून चक्रे साफ करतात.

यापुढे अशा अनेक शक्या साधकांना अशा पुजेच्या वेळी मिळूं शकतात तेंव्हा अशा पुजेच्या प्रसंगी आजूबाजूच्या गोष्टींच्या विचार करण्यांत स्वतःचा वेळ घालवून वेळेचा दुरूपयोग करूं नये. श्री माताजीच्या पुजेवर लक्ष केंद्रित करावे. आणि श्री माताजींनी दिलेले जास्तीत जास्त ग्रहण करावे.

अशा प्रकारे पुजेच्या वेळचा प्रत्येक क्षण महत्वाचा असतो तेंव्हा अशा पुजा प्रसंगी सहजयोगी मंडळींनी अशा संधीचा जास्तीत जास्त लाभ घेण्याचा प्रयत्न करावा.

अशा वेळी सहजयोग्यांनी लक्षांत ठेवावं की ते साक्षात आदिशक्तिसमोर बसले आहेत. आणि त्यांनी डोळे मिटूं नयेत जर श्री माताजींनीच मुद्दाम सांगितले असेल तर बंद करावे.

## पुजेच्या वेळचा प्रोटोकॉल

चित्त नेहमी पुजेमध्ये असावे, तात्पुरत्या अडचणींकडे नको. नवीन साधक, ज्यांनी श्री माताजींचे दैवी स्वरूप अजून जाणले नाही त्यांना सहजयोगी मंडळींनी आणूं नये. कारण त्यामुळे पुजेच्या व्हायब्रेशन्सवर परिणाम होतो.

प्रत्येकाने हृदयाने पुजेच्या प्रत्येक क्षणांत सहभागी होण्याचा प्रयत्न करावा आणि चित्ताने व्हायब्रेशन्सची जास्तीत जास्त पातळी शोषण्याचा प्रयत्न करावा, यामुळे नुसती आपल्या वैयक्तिक उन्नतिला मदत मिळते असे नाही, तर आपल्या आईने तिच्या शरीरामध्ये तयार केलेली व्हायब्रेशन्स शोषण करून तिला समाधान देण्याचीही सेवा होते.

पुजेनंतर श्री माताजींनी मान्य केल्यास साधकांना श्री माताजींचे दर्शन घेता येईल.

श्री माताजींनी परवानगी दिल्याशिवाय कोणीही त्यांना स्पर्श करूं नये. तसे करणे हे दैवी नियमांविरूध्द आहे.

श्री माताजी जेव्हां पुजेच्या स्थळावरून जाण्यासाठी उठतात, तेव्हां प्रत्येकाने उठून त्यांचा आदर करावा.

निघण्या आधी आदरपूर्वक प्रसाद घ्यावा.

श्री माताजींचा फोटो आपल्या घरामध्ये अथवा जिथे असेल तिथे त्यांचं प्रतिनिधित्व करतो. तेंव्हां तो आदरपूर्वक ठेवावा. सर्व नियमांचे पालन करावे. तो उंच जागी असावा. वारंवार हलवूं नये.

फोटो ही घराच्या शोभेची वस्तू नव्हे, त्यामुळे नेहमी फुले वाहून, फोटो पुसून, कुंकु वाहून फोटोची पुजा करावी. शक्य असेल तर तेलाचा दिवा किंवा मेणबत्ती सकाळी आणि संध्याकाळी लावावी. आणि मंत्र म्हणावे.

पाय आणि पावलं फोटोकडे करू नये. झोपेतसुध्दा. आणि चुकून असं झालंच तर विनयपूर्वक क्षमा मागा.

सामुहिक पुजा आणि ध्यान यांमध्ये मंत्र आणि आरती म्हणून झाल्यावर श्री माताजींनी म्हटलं आहे की तेच भक्तिचं वातावरण आणि शांतता आणखी थोडा वेळ ठेवावी. कारण आपण पू. श्री. माताजींना हजर असण्याची विनंती केली असते, पुजा स्वीकारण्याची प्रार्थना केली असते. आणि त्यांचं अस्तित्व सर्वांना व्हायब्रेशन्सनी अविष्कृत झालेले समजत असते त्या वेळी, सहजयोगींनी शांततेमध्ये

बसून थोडा वेळ व्हायब्रेशन्सचा आनंद लुटावा आणि शक्य तेव्हढी व्हायब्रेशन्स शोषून घ्यावी.

पुजेच्या वेळी तसेच समुहिक ध्यानाच्या वेळी साधारणतः सहज योगाच्या गोष्टींबद्दलचे बोलणे टाळावे कारण आपले चित्त विचलित होते.

पुजेनंतर बंधन घालावे. ते पवित्र व्हायब्रेशन्सचे कवच आहे जे आपले रक्षण करते. म्हणून हे निर्विचारतेत करावे आणि श्री माताजीबद्दल अतीव आदर दाखवून घालावे. आपण कुंडलिनी वर घेतली पाहिजे, त्यायोगे समतोलपणासाधतो आणि आपण निर्विचारीतेमध्ये राहातो. संवयीने चित्त अंतर्यामी घेऊन ही कुंडलिनी चढवू शकतो.

जरूरीचे काय आहे ?

आत्तापर्यन्त तुम्हांला समजले असेल की जरूरीचे कांहीच नाही पण भक्ति आणि निर्विचारिता. पुजेचा समारंभ म्हणजे मानवाला देवाण घेवाण करण्याची लीला करण्याची संधी देण्याची मधुर अविष्कृति आहे.

"देव हजार हातांनी देतो "

हे म्हणणेच दर्शविते की दैवी शक्तिच अधीर आहे, देण्याचे हावभाव करण्यासाठी कारण देवालाच त्याच्या हितकारीतेत आणि प्रेमात आपल्याला न्हाऊं घालण्याची इच्छा आहे.

या लिखाणाला तीन प्रकारे वापरता येईल.

1) श्री माताजीच्या उपस्थितीतील मोठया पुजांसाठी स्वतःला तयार करणे.

2) कांही विशेष कारणासाठी ज्या सेंटर्सना समुहिक पुजा करायची आहे त्यांना -

3) घरी साधी पुजा करतांना.

पहिली गोष्ट म्हणजे पूर्ण समारंभ जो स्वतःला श्री माताजीच्या उपस्थितीत मोठया पुजांसाठी तयारी करण्यास उपयोगी पडतो. आपण जे अर्पण करतो त्यालाही महत्व असतं. द्रष्ट्रे, साधू ज्यांनी पुजा आणि मंत्र तयार केले त्यांना ते स्वतः काय करीत आहेत, त्याचं महत्व माहीत होतं. आणि श्री माताजींनी हे वागण्याचे नियम सांगितले आहेत. त्यामुळे हे सर्व परिस्थिती आणि वातावरण यांना अनुकूल व तसेच त्यांच्यानुसार बदलूं शकतात. हे नियम यासाठी आहेत की श्री माताजीच्या उपस्थितीमध्ये ज्या देवतांची पुजा केली जाते त्यांना लोक खूष ठेवूं शकतात. कोणत्याही प्रकारची कर्मकांडे चैतन्यलहरींची जाणीव व श्रीमाताजीच्या कृपाप्रसादाचा अनुभव, यांची जागा घेऊं शकत नाहीत. पण त्याउलट अशी कर्मकांडे त्यांच्या विरोधांत कार्य करतात. आपण -

## - काय जरूरीचे आहे -

जरी आपल्या आईवर प्रेम करीत असलो तरी आदराशिवाय कोणत्याही दैवताची पूजा होऊ शकत नाही. तर तिथे आदर आणि वागणुकीचे नियम यांची गरज आहे. जेव्हढी जास्त प्रेम आणि भक्ति आपल्याला वाटते तेव्हढाच आपल्याला वाटणारा आदर व्यक्त होत जातो. पहिली गोष्ट म्हणजे या समारंभाविषयी वाचन करणे आणि तो काय आहे ते शोधून काढणे.

दुसरी गोष्ट म्हणजे ज्या केंद्राना कांही विशिष्ठ समारंभासाठी सामुहिक पुजा करावयाची असते त्यावेळी त्यांना मार्गदर्शन व्हावे यामुळे त्यांना कल्पना येईल. कांही वेळा कांही गोष्टींची गरज नसेल नुसतं शांततेच होईल.

तिसरी गोष्ट साधी घरच्याघरी पूजा असेल तर श्री. माताजीच्या चरण कमलांचे प्रक्षालन फुले, उदबत्या, दिप, धूप वहाणे थोडे श्लोक हे पुरेसे होऊं शकते. आपली भक्ति व्यक्त करण्यासाठी आपण जी पुजा करतो त्यासाठी लागणा-या सामानाची यादी पुढे दिली आहे.

1) फोटोसमोर :-

पांच गोष्टी फोटोसमोर ठेवाव्या.

1. दिवा / मेणबत्ती, उदबत्ती.
2. शंख
3. घंटा
4. कलश (पाण्याचा)
5. नारळ

पुजेची जागा - छोटे टेबल किंवा पाट ज्यावर कापडाचे आच्छादन असेल.

2) श्री माताजीचे चरणकमलांचा अभिषेक :-

1. भांडेभर गरम पाणी-जसे कांही श्री माताजी स्वतःच उपस्थित आहेत. 2. पाणी ओतण्यासाठी भांडे यासाठी गुलाबपाणी वापरल्यास चालेल. 3. एक थाळी किंवा परात. व्हायब्रेटेड पाणी गोळा करण्यासाठी. सर्व पुजेतील भांडी - कलश, परात वगैरेना कुंकवाने सुशोभित करणे महत्वाचे आहे. थाळीच्या तळाशी कुंकवाने स्वस्तिक काढावे. टॉवेल्स स्वच्छ असावी. शक्यतो नवी वापरावी जी पुजेसाठी वेगळी ठेवली असतील.

3) पंचामृत :-

एक मोठं भांडं आणि पांच लहान भांडी लागतात. ती धातूची असूं शकतात. पण तांबे दहयावर क्रिया करते त्यासांठी दहयाचे भांडे तांब्याचे नसावे या भांडयामध्ये कुंकू लावण्याची गरज नाही. (कारण कुंकु खाण्याचा पदार्थ नाही) पंचामृत करण्याच्या पांच गोष्टी या भांडयांमध्ये असाव्या - 1 मध, 2. दूध, 3. साखर, 4. दही, 5. तूप

4) अक्षता :-

स्वागत करण्यासाठी अक्षता (कुंकू मिश्रीत तांदूळ) अर्पण करण्याची पध्दत आहे, पुजेच्या सुरूवातीला मंत्रानंतर देवाला त्या अर्पण करतात.

5) सजावट :-

थोडयाशा कापसाच्या बोळयावर अत्तर घेऊन ते श्री माताजींच्या चरणांना लावतात. त्यांच्या दोन्ही चरणांवर ओल्या कुंकूवाच्या (पाणी + कुंकू) मिश्रणाने स्वस्तिक काढतात. फुले आणि फळे (लिंबू नाही सायट्रस फ्रुट नाही) अर्पण करावी.

6) कुंकू (गंध) :-

पाण्याने कुंकू ओले करून त्याच्या पेस्टने पुजेची भांडी जी वापरांत येतात, ती सुशोभित करावी ती पवित्र असली पाहिजेत, कुंकूवाने आपण श्री माताजींचे कुंकू - हात, चरण सुशोभित करावे. श्री माताजींसाठी वापरांत येणारे कुंकू वेगळे ठेवावे. ते इतर गोष्टींसाठी वापरूं नये. पुजेमध्ये सहभाग घेणा-यांनी सुध्दा कुंकू लावावे.

7) नारळ :-

पाणीवाला मोठा नारळ घ्या. नारळ श्री गणेशाला वहायचा असतो. त्यावर कुंकवाने स्वस्तिक काढायचे आणि वर सुध्दा तीन ठिकाणी कुंकवाने टिंबे काढायची त्यांना श्री शिवाचे तीन डोळे म्हणतात. - नारळाच्या डोळयांवर कुंकू लावतात.

नारळ एका विशिष्ट प्रकारची व्हायब्रेशन्स देतो तो निगेटिव्हीटीचे सुध्दां शोषण करतो. तो जास्त दिवस ठेवूं नये. (लिंबाप्रमाणे) तो नंतर पुरून टाकावा किंवा पाण्यांत सोडावा. (फुले आणि प्रसाद यांसह).

8) **आरती :-**

आपण फोटोची ज्योतीने आरती करतो आणि आरती म्हणून पुजा संपवितो. छोटा तुपाचा दिवा किंवा मेणबत्ती, उदबत्ती, कापूर, कापराचे छोटे छोटे तुकडे करून वापरा. तो एकदम खूप गरम होतो म्हणून काळजी घ्या.

गाणं संपेपर्यन्त आरती करूं शकतो. ती शांततेमध्ये 108 वेळां पण करूं शकतो.

9) **पुजेची तारीख :-**

मोठया पुजेसाठी दिवस आणि चंद्राचे स्थान - तिथी सांगणे योग्य आहे. प्रत्येक दिवस एका देवताच्या ताब्यांत असतो. त्यामुळे विशिष्ट दिवसाची पुजा विशिष्ट देवतेला अर्पण करूं शकतो.

| वार | नक्षत्र | चक्र | देवता |
|---|---|---|---|
| सोमवार | चंद्र | सहस्त्रार | श्री माताजी निर्मला देवी |
| मंगळवार | मंगळ | मुलाधार | श्री गणेश |
| बुधवार | बुध | स्वाधिष्ठान | श्री स्वरस्वती ब्रम्हदेव |
| गुरूवार | गुरू | नाभी | श्रीविष्णु, आदिगुरू |
| शुक्रवार | शुक्र | अनाहत | श्री शिव |
| शनिवार | शनी | विशुध्दी | श्रीकृष्ण |
| रविवार | रवी | आज्ञा | श्री जिझस |

10) **प्रसाद :-**

प्रसाद सर्वांना वाटायचा असतो. प्रसाद पुजेत सहभागी होणा-यांनी खायचा किंवा प्यायचा असतो. श्री माताजीनी व्यक्तिशः दिलेले अन्न "प्रसाद" समजावे जेंव्हां फोटोची पुजा केली जाते तेंव्हां पाणी आणि पंचामृताचे घटक पदार्थ बोटांनी लावूं नये. ती फोटोवर हळूंहळूं ओतावी. त्यायोगे ज्या पंचामृताचा आपण प्रसाद म्हणून वापर करतो त्याची व्हायब्रेशन्स संभाळली जातात.

## ◇◇- सूचना -◇◇

### आवश्यक सूचना :-

पुजा लोकांच्या वैयक्तिक चक्रांच्या स्वच्छतेसाठी नसते तर सामुहिक शुध्दीसांठी असते. ती आपल्या आईचं चित्त वेघून घेते. त्या स्वतःच आपल्या चक्रांच्या व्हायब्रेशन्सच्या द्वारे पातळीकडे अधिक चांगल्या त-हेने सर्वांवर लक्ष देवू शकतात. प्रत्येकाने साक्षी स्वरूपात ही सर्व लीला पाहायची असते त्यावेळी स्वतः या चक्रांच्या स्थितीचा विचार करूं नये. शांत पणाने रिलॅक्स होऊन व्हायब्रेशन्स जाणून घ्यावी. यावेळी चित्त सहस्त्रारावर ठेवण्याचा प्रयत्न करावा.

आपल्याला हे समजून घेतलं पाहीजे की पुजेसाठी आपण देवताला उपस्थित राहाण्यासाठी आमंत्रण देत आहोत हा दृष्टीकोन जोपासला पाहिजे. व्हायब्रेशन्सची कृपा शोषण्याची, शब्दशः शोषून घेण्याची इच्छा पाहिजे. आणि हे सर्व होण्यासाठी बुध्दीचा वापर करण्याची जरूरच नाही तरच हे जास्तीत जास्त रित्या कार्यान्वित होईल, जरी आपण व्यक्तिशः श्री माताजींचे चरण धूत नसलो तरी अर्पण करण्याचा सहभाग घेण्याचा दृष्टीकोन ठेवावा.

डोळे उघडे ठेवावे, आपण या पुजेच्या प्रसंगी उपस्थित राहू शकलो तर किती सुदैवी, नशीबवान आहोत या जाणिवेने होणारा आनंद सतत कायम ठेवावा.

या सर्व गोष्टी श्री माताजीच्या प्रत्यक्ष उपस्थितीत तसेच त्यांच्या व्हायब्रेशन्सरूपी अस्तित्वात देखील प्रोटोकॉलनुसार आहेत.

छोटया घरामध्ये कुटुंबासमवेत किंवा एकटयाने पुजा करतांना त्या व्यक्तिने स्वच्छ होऊन, खोली स्वच्छ करून पुजेच्या स्थानाला घरातील आदरणीय जागेप्रमाणे मान द्यावा - म्हणजे कसलीही निगेटीव्हीटी आड येणार नाही.

### समारंभाचे आयोजन :-

कोणीही एकटे असेल किंवा कुटुंबात किंवा मुख्य पुजेस किंवा साधा दिवस तर वेगवेगळया प्रकारे हे फॉर्म्युले वापरून वर लिहीलेल्या कृतिने पुजा करतां येते. वर चर्चिलेल्या सर्व पाय-या एका मागून एक असणे आवश्यक आहे असेच नाही.

## न्यास

1. घरी, कोणत्याही दिवशी.
   सर्वात लहान फॉर्म्युला
   नं. 1-9, 17-18, 19-22, 23-25 किंवा 26-27.
   श्री गणेशाची पुजा
   नं. 1-8-9-11 ते 16-26-27

2. सहजयोगींमधील विशिष्ट प्रसंगानिमित्तची पुजा.
   ( उदा. श्री माताजी विशिष्ट ठिकाणी पुजा करणार असतात तेव्हां, पुजेच्या दिवशी-)
   नं. 1 ते 3-5/6-8 ते 13 किंवा 14-15/16.
   मग नं. 17 ते 19-22 ते 27.

3. श्री गणेशाची मोठी पुजा-
   नं. 1 ते 10-11 ते 15-22 ते शेवटपर्यंत.

पंचामृत देवीला अर्पण केले पाहिजे ती गौरी असेल, श्री लक्ष्मी असेल किंवा श्री माताजी असतील.

देवीला किंवा श्री माताजीना मंत्राने जागृत करावे. जर पुजा देवाची असेल उदा. श्री विष्णु तर प्रथम श्री गणेशांना नंतर श्री विष्णु आणि मग देवीला. अभिषेकाचे वेळी असे करावे.

**न्यास :-**

न्यास म्हणजे शरीराच्या अंतर्यामी स्वतःला तयार करणे, तो वेगळया भागांत विभाजले आहे.

- श्री गणेशाचा मंत्र
- श्री विष्णुचा मंत्र
- प्राणायाम ( हवे असल्यास )
- गुरुमंत्र
- गायत्रीमंत्र

11) **श्री गणेशाचा मंत्र :-**

मंत्रोच्चार स्पष्टपणे करावा नाहीतर त्याला अर्थ नसतो. मुलाधार चक्राला जागृत करण्यांसाठी श्री गणेशाचा मंत्र म्हणतात. तो आपण चार वेळा म्हणू शकतो.

ओम-त्वमेव साक्षात् श्री गणेश साक्षात् श्री आदिशक्ति माताजी श्री निर्मला देव्यै नमो नमः

12) श्री विष्णुची नांवे :-

मुख्य नाड्यांवरील दैवताची जागृति करण्यासाठी श्री विष्णुची नांवे घेतली जातात.
कधी कधी पहिली 4 नांवे 3 वेळां घेतली जातात.
ओम त्वमेव साक्षात् श्री लक्ष्मीविष्णु साक्षात
श्री आदिशक्ति माताजी श्री निर्मलादेव्यै नमो नमः।

13) श्री विष्णुची चोवीस नांवे :-

ओम त्वमेव साक्षात् ---------- नमः।
( खरोखर तूंच आहेस )

श्री केशवाय
श्री नारायणाय
श्री माधवाय
श्री गोविंदाय
श्री विष्णवे
श्री मधुसुदनाय
श्री त्रिविक्रमाय
श्री वामनाय
श्री श्रीधराय
श्री हृषीकेशाय
श्री पद्मनाभाय
श्री दामोदराय
श्री शंकरशनाय
श्री वसुदेवाय
श्री प्रद्युम्नाय
श्री अनिरूध्दाय
श्री पुरुषोत्तमाय

श्री अधोक्षाय
श्री नरसिंहाय
श्री उपेंद्राय
श्री अच्युत्ताय
श्री जनार्दनाय
श्री हरये
श्री कृष्णाय

साक्षात् श्री आदिशक्ति माताजी श्री निर्मला देव्यै नमो नमः

14) प्राणायाम :-

इडा आणि पिंगला नाडीमधील समतोलपणा साधण्यासाठी प्राणायामाचा उच्चार करतात.
( हवा तेव्हां करणे )

ओम प्रणवस्य परब्रम्ह ऋषीः । परमात्मा देवता ।
दैवी गायत्री छंदः । गायत्री गाथिनो विश्वामित्र ऋषीः ।
सविता देवता । गायत्री छंदः । प्राणायामे विनियोगः

ओम् या प्रणवाचा परब्रम्ह ऋषि, परमात्मा देवता व गायत्री छंद आहे. तसेच गायत्री मंत्राचा विश्वामित्र ऋषी सविता देवता व गायत्री छंद आहे.

15) गुरुमंत्रः-

गुरुमंत्र भवसागराची जागृति करण्यासाठी म्हटला जातो.

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वराः ।
गुरुःसाक्षात् परब्रम्ह तस्मै श्रीगुरवे नमः ।

गुरुतत्वाचा आपण आदर करतो. ब्रम्हा, विष्णु, महेश ( शिव ) या तिन्ही देवांच्या अबाधितेने तयार झालेले गुरुतत्व श्री माताजींच्या कृपेमध्ये आपण त्याची पुजा करत आहोत.

16) गायत्री मंत्रः-

उजव्या बाजूला असलेली ( पिंगला नाडीवर ) पंचमहाभूताची मुलतत्वे यांच्याशी गायत्री मंत्र संबंधित आहे.
भूः हे पृथ्वीचं तत्व आहे मूलाधार चक्र
भुवः हे आप - निर्मिती - स्वाधिष्ठान चक्र
स्वः हे अग्नि -नाभीचक्र
महः प्रेम - अनाहतचक्र
जनः आकाश (समूहिकता) - विशुध्दी चक्र
तपः सूर्य - आज्ञाचक्र
सत्यम् - सहस्त्रार चक्राच्या व्हायब्रेशन्सनी प्रकट होतं.

ओम् भूः ओम् भुवः ओम् स्वः ओम् महः
ओम् जनः ओम् तपः ओम् सत्यम् ।
ओम् भूर्भुवः स्वः ।।
ओम् तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो योनः प्रचोदयात् ।।
ओम् आपो ज्योती रसोमृतं ब्रम्ह भूर्भुवः स्वरोम् ।।

पृथ्वी जल, अग्नि, वायु, अंतरिक्ष , तेज आणि व्हायब्रेशन्स यांना आमचे नमस्कार. आम्ही त्या सूर्याचे ध्यान करतो जो सर्व विश्वाला जीवन देतो त्याने आमच्या बुध्दीला प्रेरणा द्यावी.

17) वंदन, प्रार्थना, आवाहन :-

ओम्

| | |
|---|---|
| श्री मन्महागणाधिपतये नमः । | गणांच्या महान नेत्याला वंदन. |
| श्री सरस्वत्यै नमः । | सरस्वतीला वंदन. |
| श्री गुरुभ्यो नमः | गुरुतत्वाला वंदन. |
| वेदाय नमः। | वेदांना वंदन. |
| वेदपुरुषाय नमः । | संत साधु यांना वंदन. |
| इष्टदेवताभ्यो नमः । | इच्छित देवतांना वंदन. |

| | |
|---|---|
| कुलदेवताभ्यो नमः। | कुलदेवतेला वंदन. |
| ग्रामदेवताभ्यो नमः। | गावाच्या देवतेला वंदन. |
| स्थान देवताभ्यो नमः। | स्थळाच्या देवतेला वंदन. |
| वास्तुदेवताभ्यो नमः। | त्या वास्तुच्या देवतेला वंदन. |
| शचीपुरंदराभ्यों नमः । | इंद्राला वंदन |
| उमामहेश्वराभ्यां नमः । | शिवपार्वतीला वंदन. |
| श्री लक्ष्मीनारायणाभ्यां नमः । | श्री लक्ष्मी नारायणाला वंदन. |
| कालकामपरशुरामेभ्यो नमः । | परशुरामाला वंदन. |
| माता पितृभ्यां नमः । | आई वडिलांना वंदन. |
| आदित्यादिनवग्रदेवताभ्यो नमः । | सूर्य, ग्रह, नक्षत्रांना वंदन. |
| सर्वेभ्यो देवेभ्यो नमः । | सर्व देवांना वंदन. |
| सर्वेभ्यो ब्राम्हणेभ्यो नमः । | सर्व आत्मसाक्षात्कारी लोकांना वंदन. |

श्री गणेश आणि इतर रक्षणकर्त्या देवतांना वंदन.

सूक्ष्मामध्ये मानवाला ज्या सर्वांनी त्याचं जगणं शक्य केलं आहे त्या सर्वांचा आदर करणे, त्यांना वंदन करणे जरुरीचे आहे.

आपल्याला मिळालेला हा जन्म म्हणजे आपल्याला उत्क्रांती साधण्यासाठीची संधी देणारं या दृष्टीकोनातून पाहिल पाहिजे. श्री माताजींकडून आत्मसाक्षात्कार मिळण्याचा केव्हढा मान आपल्याला मिळाला आहे. पुजेच्या वेळी ही भावना नेहमीच आपल्या हृदयात असली पाहिजे. त्यामुळे आपल्याला योग्य प्रकारे श्री माताजीचा आदर करण्यांत मदत होते आणि पुजेचा जास्तीत जास्त लाभ मिळतो.

उर्वरित भाग देवतेच्या आवाहनाचा आहे.

त्यातील पहिला भाग नेहमीच वापरावयाचा आहे. प्रार्थनांचे इतरही प्रकार वापरता येतात.

परिस्थितीनुसार ते वापरावे. उदा. सेमिनार, उद्‌घाटन ,वार्षिक वाढदिवस इ. आणि त्यात सुधारणा करता येतील.

18) अविघ्नमस्तु :-

पुजेआधी असे पान लिहून तयार ठेवावे.

शालिवाहन शकाच्या _ _ _ _ संवत्सरांतील _ _ _ _ महिन्याच्या शुक्ल/कृष्ण पक्षाच्या _ _ तिथीला _ _ वारी जगांतील सर्व सहजयोगी यांच्या सामुहिक उन्नतीसाठी आम्ही सर्व सहजयोगी मंडळी प.पू.श्री माताजीच्या चरणी देवतेच्या अनुग्रहाप्रित्यर्थ _ _ _ पुजा समर्पित करण्याचा संकल्प सोडतो.

या पुजेमध्ये आम्ही श्री माताजीची प्रार्थना करीत आहोत की, श्री माताजी, आपण साक्षात गणेश आहात, कृपा करुन, आम्हांला सूज्ञता, विवेक प्रदान करा. आपल्या कृपेमध्ये आमच्यामध्ये नम्रता येऊं दे. आपण प्रसन्न व्हावं ही आमची हृदयापासून प्रार्थना आहे. श्री माताजी आपल्या कृपेने आमच्यामधील गणेशतत्व शुध्द होऊं दे. आपण कृपावंत व्हावे आणि आम्ही अजाण बालकांनी आपल्या सिमित पात्रतेनुसार भक्तिभावाने केलेल्या या पुजेचा स्वीकार करावा.

अजाणतेमुळे ही पुजा करतांना ज्या कांही चुका आम्ही केल्या असतील त्यासाठी आम्हांला क्षमा करावी.

19) पुजासाहित्याचे पूजन :-

पुजेचे एक अंग म्हणून पुजेच्या वेळी वापरांत येणा-या साहित्याचे आसन, कलश, शंख, घंटा, दीप इ. चे पूजन गंध, अक्षता, फुले लावून करावे. खालील प्रार्थना म्हणाव्या. छोटया पुजेला शांततेत केल्यास चालेल.

कलशपुजा :-

यांत पुजेचे पाणी असते. त्याचे मुख श्री विष्णु, गळयाचा भाग - कंठ - श्री शिव, तळाचा भाग श्री ब्रम्हदेव आणि मध्यभागी मातृदेवता, सर्व शक्त्या वास करतात. चार वेद आणि सर्व ईशस्तत्त्वनांचेसुध्दा ते प्रतिनिधित्व करतात.

आयांतु देवपूजार्थं दुरितक्षयकारिकाः ।
गंगे च यमुने चैव गोदावरि सरस्वति ।
नर्मदे सिंधु कावेरी जलेःस्मिन् सन्निधिं कुरु ।।

शंखपुजा :-

शंखामध्ये चंद्र ,बाजूला वरुण, पृष्ठभागी प्रजापति ज्याने प्रकृति निर्माण केली आणि त्याच्या तोंडाशी सरस्वति आणि गंगा वास करतात. शंख सागरांतून उत्पन्न झाला. श्री विष्णु त्याला स्वतःच्या हातात धरतो. ज्याची सर्व देव स्तुति करतात. या शंखाने आम्हां सर्वांना दैवी विद्या द्यावी.

घंटापुजा :-

देवांचे आगमन आणि राक्षसांचे गमन घोषित करण्यासाठी, हे घंटे, तू नाद कर देवांचे जागरण झाले, याची स्तुति घंटेला करु दे.

आगमार्थं तु देवानां गमनार्थं तु रक्षसाम् ।
कुरु घंटे रवं तत्र देवताभ्यान लक्षणम् ।।
घण्टायै नमः ।

दीपपूजा :-

दीपाच्या देवतेला वंदन , ते ब्रम्हाचं स्वरुप आहे. त्याची ज्योत उंच आणि सतत प्रकाशित असू दे.

कुंभपुजा :-

श्री माताजीच्या स्थानाला, जे सर्व विश्वाचा साच्याचे प्रतीक आहे , त्याला आमचे वंदन. श्रीफळ जे श्रीगणेशाच्या विश्वाचे जागरण करते त्याला ते आधारभूत असते.

20) देवीचे वंदन :-

तुझ्यामध्येच हजार पुरुष आहेत.
तुझे हजार डोळे आहेत.
तुझ्या हजार शकत्या आहेत.

नम्रतेने आम्ही तुझी प्रार्थना करतो. तुला आवाहन करतो की या पुजेच्या समारंभाला तूं उपस्थित रहावेस. यानंतर श्री गणेशाची पुजा आणि मुख्य देवतेची पुजा करावयाची.

# प्रार्थना आवाहन

**श्री गणेशाला अर्पण केलेली पुजा :-**

| | |
|---|---|
| श्री गणेशाचा मंत्र | नं. 11 |
| अक्षता घालणे | नं. 12 |
| चरण प्रक्षालन | नं. 13 |
| अमृत | नं. 21 |
| सजावट | नं. 22 |
| अर्पण | नं. 23 |
| आरती | नं. 24 |

**दुस-या दैवताला अर्पण केलेली पुजा :-**

| | |
|---|---|
| श्री गणेशाचा मंत्र | नं. 11 |
| श्री गणेशाला अर्पण | नं. 15 |
| कृतज्ञता व्यक्त करणारा मंत्र | नं. 16 |
| त्या देवतेचा मंत्र | नं. 17 आणि 18 |
| चरण | नं. 14 |
| अमृत | नं. 21 |
| सजावट | नं. 22 |
| अर्पण आणि आरती | नं. 23,24 |

**श्री गणेशाची पुजा :-**

प्रत्येक पुजा श्री गणेशाच्या स्तुतीने सुरु होते. त्याची प्रथम पुजा करतात कारण तोच दार आहे आणि तो विघ्ने, अडचणी दूर करतो.

श्री माताजींच्या चरणांचा फोटो घेणे.

कोमट पाणी आणि लाल टॅविलने चरण धुवून काढायचे. फोटोवर पाणी ओततांना तसं काही श्री गणेशाचे चरण धुत आहोत असं करायचं. उजवा हात वापरणं चांगले. डावा हात, उजव्या हातांचे मनगट पकडतो घड्याळाच्या काट्याच्या दिशेने धुवायचे. पाणी व इतर गोष्टी वापरण्याआधी त्यांना स्पर्श होऊ देऊ नये.

देवाला पूजित असल्याने हातांनी बोटांनी आपण व्हायब्रेशन्स शोषू शकतो.

21) श्री गणेशाचा मंत्र

ओम् त्वमेव साक्षात् श्री गणेश साक्षात,
श्री आदिशक्ति माताजी श्री निर्मला देव्यै नमो नमः ।

22) अक्षता -

हळद कुंकूनी सुशोभित केलेल्या अक्षता
स्वागताचे चिन्ह म्हणून एका भांडयात - पेल्यात आपण कराव्या,
ओम् त्वमेव साक्षात् श्री महागणपति देवताभ्यों नमः ।
अक्षताम् सर्मपयामि ।
ओम् भूः भुवः स्वः महागणपती देवताभ्यो नमः ।

23) श्री गणेशाच्या चरणांचे प्रक्षालन
ओम् श्री महागणपती देवताभ्यो नमः
पाद्यम् सर्मपयामि ।।

या वेळी आपण अथर्वशीर्ष वाचूं शकतो, श्री गणेशाचे 108 नांवेसुध्दां वाचूं शकतो. किंवा गीताच्या स्वरूपांत गाऊं शकतो.

24) गणेश अथर्वशीर्ष

ओम् नमस्ते गणपतये । त्वमेव प्रत्यक्षं तत्वमसि ।।
त्वमेव केवलं कर्तासि ।। त्वमेव केवलं धर्तासि ।।
त्वमेव सर्वम् खल्विदं ब्रम्हासि ।। त्वम् साक्षात आत्मासि नित्यम् ।। । ।।
ऋतं वच्मि । सत्यं वच्मि ।। 2 ।।
अव त्वं मां । अव वक्तारं । अव श्रोतारं । अव दातारं ।।
अव धातारं । अवानूचानमव शिष्यं ।।
अव पश्चात्तात् अव पुरस्तात, । अवोत्तरात् अव दक्षिणात्तात ।।
अवचोर्ध्वातात् । अवाधरात्तात् । सर्वतो मां पाहि पाहि समंतात ।।3।।

त्वं वाङ्ःमयस्त्वं चिन्मयः । त्वमानंदमयस्त्वं ब्रम्हमयः ।।
त्वं सच्चिदानंदाद्वितीयो सि । त्वं प्रत्यक्षं ब्रम्हासि ।।
त्वं ज्ञानमयो विज्ञानमयो सि ।। 4 ।।

सर्वं जगदिदं त्वत्तो जायते । सर्वं जगदिदं त्वत्तस्तिष्ठत्ति ।।
सर्वं जगदिदं त्वयि लयमेष्यति । सर्वं जगदिदं त्वयि प्रत्येति ।।
त्वं भूमिरापो नलो निलो नभः । त्वं चत्वारि वाक् पदानि ॥5॥

त्वं गुणत्रयातितः । त्वं देहत्रयातितः ।
त्वं कालत्रयातित : ।
त्वं मूलाधारस्थितो सि नित्यम् । त्वं शक्तित्रयात्मकः ।।
त्वां योगिनो ध्यायंति नित्यम् । त्वं ब्रम्हा त्वं विष्णुस्त्वं
रुद्रस्त्वं इंद्रस्त्वं अग्निस्त्वं वायुस्त्वं सूर्यस्त्वं चंद्रमास्त्वं
ब्रम्हभूर्भुवः स्वरोम् ।। 6 ।।

गणादीम् पूर्वमुच्चार्य वर्णादिं तदनंतरं । अनुस्वारः परतरः ।
अर्धेन्दुलसितं । तारेण ऋध्दं । एतत्तव मनु स्वरूपं । गकारः
पूर्वरूपं । अकारो मध्यमरूपं । अनुस्वारश्चान्त्यरूपं । बिन्दुरूत्तररूपं
नादः संधानं । स ॅ हितासंधिः सैषा गणेशविद्या ।
गणकऋषिः निचृद्‌गायत्रीच्छंदः । गणपतीर्देवता ।
ओम् गँ गणपतये नमः ।। 7 ।।
एकदंताय विद्महे । वक्रतुण्डाय धीमहि ।
तन्नो दंती प्रचोदयात् ।। 8 ।।

एकदंतं चर्तुहस्तं पाशमांकुश धारिणम्
रदंच वरदं हस्तै र्बिभ्राणं मूषकध्वजम् ।
रक्तं लंबोदरं शूर्पकर्णकं रक्त वाससम ।
रक्त गंधानु लिप्तांगं रक्त पुष्पैः सुपूजितम् ।
भक्तानुकंपिनं देवं जगत्कारणमच्युत्तम् ।
आविर्भूतं च सृष्टयादौ प्रकृते : पुरूषात्परम् ।
एवं ध्यायंति यो नित्यं स योगी योगीनां वरः ।। 9 ।।

नमो व्रातपत्यये । नमो गणपतये ।। नमः प्रथमपतये ।
नमस्ते स्तु लम्बोदरायैकदत्ताय् । विघ्ननाशिने शिवसुताय ।
श्री वरदमूर्तये नमः ।। 10 ।।
साक्षात श्री आदिशक्ति माताजी श्री निर्मलादेव्यै नमो नमः ।।